# ढोलताशे

( दोन अंकी नाटक )

चं. प्र. देशपांडे



# ढोलताशे

(दोन अंकी नाटक )

-- चं. प्र. देशपांडे.

## अंक पहिला

( पुण्यातल्या लक्ष्मीरोडवरचे, पहिल्या मजल्यावरचे  घर. जुने पण रंग दिलेले. डाव्या हाताला मागे पायरीवरून गॅलरीत जाण्याचे दार. समोर, मागे, मध्याच्या उजव्या हाताला एक खिडकी. डाव्या हाताला दिवाण. समोर खुर्च्या, टी पॉय फोन वगैरे. उजव्या हाताला आत स्वयंपाकघर व बाथरूम असून डाव्या हाताला इतर एकदोन खोल्यांकडे जाण्याचे दार आहे. जिन्यावरून वर येऊन घरात येण्याचे दार उजव्या हाताला अगदी जवळ आहे.

पडदा उघडण्यापूर्वीच ढोलताशे आणि झांजा यांचा तडाखेबंद आवाज सुरू होतो. काही क्षणांनंतर पडदा उघडतो. अनंत-चतुर्दशीचा दिवस. खाली रोडवर गणपती विसर्जनाची मिरवणूक चालू आहे. खिडकीशी अवंती ( सुमारे २७) पाठमोरी उभी असून ती मिरवणूक पाहतेय. गॅलरीचे दारही उघडे. दाराच्या उघड्या भागातून आणि खिडकीतून, तालावर वरखाली होणारे सिल्कचे भगवे झेंडे दिसतात. १,२,३,४ --५,६,७,८ असा ताल आणि प्रत्येक वेळी शिर्रर्र असा शिट्टीचा आवाज. दुपारी  चारची वेळ. पावसाळयातले ऊन. मधेच गुलाल उधळलेला दिसतो. ते झेंडे हळूहळू पुढे गेल्यावर एकच मोठा,उंच झेंडा हळूहळू पुढे जात

राहतो. हा अर्थात गणपतीजवळचा झेंडा आहे, हे उघड आहे. मिरवणुकीचा एकूण कडाडून दणका. असे काही क्षण गेल्यावर प्रवेशव्दारातून अक्षय ( सुमारे ३०) प्रवेश करतो. हातात ब्रीफकेस. त्याच्या कपड्यांवर, केसांवर थोडा गुलाल उडलेला आहे. चपला काढताकाढताच त्याचे खिडकीशी उभ्या असलेल्या अवंतीकडे लक्ष जाते. चपला काढून तो लगेच तिकडे जातो. खिडकी लावून घेतो. गॅलरीचे दार लावतो. आता खोलीत जवळजवळ अंधार -- फक्त प्रवेशव्दारातून आत येणार थोडा परावर्तित प्रकाश. अवंती नाईलाजाने मागे वळते. त्याच्याकडे पाहते. तो दिवाणाजवळ ब्रीफकेस ठेवतो. बाहेरच्या मिरवणूकीचे आवाज आता अर्थात् सौम्य. हा सौम्य आवाज नाटकभर चालू राहावा. शांततेच्या क्षणांत या आवाजाची वेगवेगळी रूपे येऊ शकतील.)

अक्षय: (कपडे, केस झटकत -- ) मिरवणूक बघायची नाही असं ठरलं होतं -- तरी --

अवंती : तू आल्यावर मी बंदच करणार होते --

अक्षय : पण म्हणजे मी येईपर्यंत --

अवंती : आमचं ऑफीस लौकर बंद केलं आज -- नुक्ती येऊन, वॉश घेऊन, जरा दारंबिरं उघडून उभी होते – कोंदटपणा येतो नाहीतर --

अक्षय : हे बाहेरचे आजाव आणि गुलालाचा धुरळा यांपेक्षा कोंदटपणा परवडला -- काहीतरी कारणं सांगू नकोस -- ( उजव्या हाताच्या दाराने आत जातो.)

अवंती : कारणं सांगायचं काय कारण आहे -- खरं ते सांगितलं -- ( तो आत गेलेला. त्याचे उत्तर नाही. ती दिवाणावर बसते. मग रिमोटने टीव्ही ऑन करते -- तर त्याच मिरवणुकीचा लाईव्ह टेलेकास्ट चालू. पुन्हा मिरवणुकीचा जोरदार आवाज. पटकन टीव्ही बंद करते. अक्षय वॉश घेऊन टावेल गुंडाळलेला येतो.)

अक्षय : ( डावीकडच्या खोलीकडे जाता जाता -- ) टीव्ही कशाला लावला ? ( जातो. )

अवंती : बंद केला -- ( काही क्षणांनी तिला अंधार जाणवतो. उठून दिवा लावते. मग उजवीकडे -- स्वयंपाक-घराकडे जाताजाता --) मी चहा करतेय --

अक्षय : ( आतूनच- ) नकोय मला चहा -- झालाय माझा -- तुला हवा तर कर -- ( ती क्षणभर थांबून वळते. येऊन खुर्चीवर बसते. अक्षय वॉश घेऊन, पायजमा, बुशशर्ट घालतेला, व्यवस्थित भांगबिंग पाडलेला येतो. दिवाणावर रिलॅक्स्ड बसतो. तेवढ्यात त्याचे उघड्या प्रवेशव्दाराकडे लक्ष जाते. उठतो.) हे पण दार बंद --( असे म्हणत जाऊन तेही दार लावतो. टीपॉय जवळ ओढून दिवाणावर बसतो. पुन्हा उठून आत जातो. आतून तोंडात सिगरेट असलेला येतो. हातातले सिगरेट पाकीट लायटर टीपॉयवर ठेवतो. दिवाणावर पडून मस्तपैकी झुरका घेऊन धूर सोडतो. अवंती पाहते.)

अवंती : दारंखिडक्या बंद असताना सिगरेट ओढू नकोस प्लीज ! धूर साठून राहतो --

अक्षय : ( पुन्हा उठत --) पंखा लावतो --

अवंती : अरे पण पंखा लावला तरी जाणार कुठं तो धूर -- इथंच फिरत राहणार --

अक्षय : ठीक आहे -- ( नाराजीनं ॲशट्रेमधे सिगरेट विझवतो आणि टाकतो. रिलॅक्स्ड पडतो. काही क्षणांनी --) आमच्याकडेही उपस्थिती कमीच होती आज -- त्यामुळं आम्हीही लौकर निघालो --

अवंती : आख्खं पुणं मानतं या सणाला -- तुझी वैयक्तिक मतं काहीही असोत --

अक्षय : या वर्षी माझ्या मताप्रमाणे जायचं ठरलंय ना--फक्त घरातला प्रश्न आहे--मला जगाचं काही घेणं नाही --

अवंती : त्याबद्दल नव्हते बोलत मी --

अक्षय : आणि गंमत म्हणजे तुला धुराच्या प्रदूषणाचं कळतं पण ध्वनीप्रदूषण, गुलालप्रदूषण यांचं कसं लक्षात येत नाही ? आणि मन सारखं असं उत्सवात गुंतवल्यामुळं आणि अशाप्रकारे मनाला उत्सवाचं प्रदूषण झाल्यामुळं आयुष्याची काय हानी होते हे कसं कळत नाही ? मनं अतिरेकी व्हायचं कारण आहे हे एक !

अवंती : ते प्रदूषणाचं ठीक आहे पण हे मनांचं जे तू काढलंयस ते सारखी तत्त्वज्ञानाची पुस्तकं वाचल्यामुळं किंवा कृष्ण शिलेदारांची व्याख्यानं ऐकल्यामुळं असेल, नाहीतर तुलाही असलं काही डोक्यात यायचा प्रश्नच नव्हता. कळतंय तर कळतंय ! चला !

अक्षय : पण कळतंय तर कळतंय असं म्हटलं तरी कळतंय हे महत्त्वाचंच आहे ना ! आणि कुठल्याही पुस्तकांशिवाय आणि साधनांशिवाय आपलं आपल्याला काही कळूच शकत नाही असं समजणंसुध्दा घातक आहे--

अवंती : सगळंच घातक आहे -- जाऊं दे ! ( काही क्षणांनी -- ) ऑफिसातल्या दोन मैत्रिणी सहकुटुंब येणार होत्या आपल्या गॅलरीतनं मिरवणूक पाह्यला -- मी म्हटलं जमणार नाही -- त्या म्हणाल्या का ? -- म्हटलं, नाही जमणार -- का ते नका विचारू -- आता कधीतरी ते सगळे इथनं खालून जाणारच -- तेव्हा आपली गॅलरी रिकामी दिसणार त्यांना -- निष्कारण वाईटपणा -- डॉग इन द मँजर सारखं दिसणार हे -- गव्हाणीतला कुत्रा कसं स्वत:ही गवत खात नाही आणि दुसऱ्या जनावरांनाही खाऊ देत नाही-- तसं !

अक्षय : पेटवून दिलं समज ते गवत आजचा दिवस !--

अवंती : कोल्हापूरहून मावशीचं पत्र आलं होतं तर तिलाही नाही म्हणून कळवायला लावलंस -- पाहिल्यांदाच येणार होते ते --

अक्षय : पुष्कळदा येऊन गेलेत --

अवंती : पण मिरवणूक बघायला पहिल्यांदाच नं -- पुण्यातला हा उत्सव जगभर गाजलेला आहे -- म्हणून वाटतं लोकांना !

अक्षय : पॅरीसचा आयफेल टॉवर पण जगभर गाजलेला आहे -- तो बघायला जा म्हणावं --

अवंती : अरे पण असं गाजलेलं -- शक्य असलेलं तरी बघायला नको ?

अक्षय : काही गरज नाही -- बाहेरनं सारखं सुख मिळवत राह्यचा प्रयत्न असतो हा ! आणि दर वर्षी हा राडा चालतोच नं इथं -- या वर्षी माझ्या म्हणण्याप्रमाणे होऊ दे -- काही बिघडत नाही -- माझ्या मनाविरुध्द घडतं तेव्हा मी सहन करतो ना ! तुमच्या मनाविरुध्द तुम्हाला का सहन करता येऊ नये !?

अवंती : तुझं एकट्याचं मत वेगळं आहे म्हणून सगळ्यांची मनं मोडायची !

अक्षय : एखादी गोष्ट मनासारखी झाली नाही तर लगेच मन मोडतं -- इथंच तर सगळी गोची आहे -- याबद्दलही शिकायची बुध्दी होऊन जाईल त्यांना-- माझं हे एक कुणाला न आवडणारं असं सत्कार्यच आहे -- मला याच्यात अपराधी नाही वाटत -- उलट समाधान वाटतं --

अवंती : मला अपराधी वाटतं पण -- तुझ्यामुळं --

अक्षय : यासुध्दा तुझ्या प्रश्नाकडं दुर्लक्ष करू नकोस -- जगणं समजण्याची संधी असते ही --

अवंती : म्हणजे तू सगळे प्राब्लेम्स तयार करत राहणार आणि बाकीच्यांनी जगणं समजून घेत बसायचं. सगळ्या संधी समजून !

अक्षय : तुला हे जे वाटतंय ते खरोखर तसंच आहे का हे आधी समजून घे --

अवंती : एवढी जंगी मिरवणूक चाललीय बाहेर आणि आपण दारंखिडक्या लावून गप्प बसायचं ! आणि आता

सगळयांना नाही म्हटल्यामुळं बंदच ठेवावं लागेल -- खालून उघडं दिसलं तर यायचे नाहीतर वर -- नाहीतर राग तरी धरणारच ते --

अक्षय : मीही माझ्या काही मित्रांना नाही म्हणून सांगितलंय --

अवंती : तेच म्हणतेय मी ! आपल्या काहीतरी किरकोळ मतांसाठी कशाला सगळयांचा वाईटपणा घ्यायचा !

अक्षय : मग काय चांगुलपणा घेण्यासाठी हानिकारक गोष्टी करायच्या आणि त्या करणाऱ्यांना प्रोत्साहन द्यायचं ? !

अवंती : हा जो तुला न पटणारं घडण्याचा एक दिवसाचा त्रास तू टाळतोयस त्याच्या कितीतरी पटींनी जास्त त्रास कायमचा मिळणार आहे अशा वागण्यानं --

अक्षय : असं लोक राग धरून वागले तर त्यांचा असमंजसपणा होईल तो --

अवंती : ते तू काहीही म्हण, पण त्रास होणारच नं -- आणि इतक्या सगळया लोकांना समंजस कसं करणार तू ?

अक्षय : कुणी कुणाला समंजस करू शकत नाही -- ज्याचं त्यानं व्हायचं असतं --

अवंती : त्यांना नाही व्हायचं -- मग काय करणार --

अक्षय : वाईट आहे हे --

अवंती : वाईट असून उपयोग काय पण !

अक्षय : मी तेच म्हणतोय ! वाईट असून उपयोग काहीच नाही ! हानी आहे उलट !

अवंती : इतक्या सगळया लोकांना जे पटतं तेच बरोबर म्हणणार कुणीही -- या असल्या वागण्याला कुणीही बरोबर म्हणणार नाही --

अक्षय : ही सगळयांना वाटण्याची जी पध्दत आहे नं ती मुळात अधार्मिक असते -- त्यामुळंच जगात युध्दं घडतात -- भ्रष्टाचार होतो - अत्याचार होतात -- माझ्या जे लक्षात येतं ते आचरणात आणायचा मी प्रयत्न करायचा नाही ? सत्य असत्यासी मन केले ग्वाही ! मानियेलें नाही बहुमत ।। -- हे विचारात घ्यायला नको ? ( इथं एकदम दिवे जातात -- अंधार होतो. )

अवंती : गेले दिवे ! आता उघडावंच लागेल नं दार -- खिडकी !

अक्षय : नको. नाही म्हणजे नाही. परमेश्वराच्या मनात काही वेगळंच दिसतंय.

अवंती : काही नको -- तू काही परमेश्वर नाहीस -- ( दिवे येतात.) बघ -- खरं आहे -- दिवे आले --

अक्षय : रोषणाईच्या गणपतींना जनरेटर्स असतात हे एक बरं आहे, नाहीतर हीच मिरवणूक मोर्चा बनून वीजमंडळावर गेली असती ! गणपतींसह !

अवंती : असल्या कल्पना बोलत जाऊ नकोस -- देवाचं अवमूल्यन होतं त्यात --

अक्षय : तुमच्या करमणुकीच्या आणि उत्सवाच्या नशेच्या लेव्हलवर आणून ठेवलाय तुम्ही देव ! कुणी केलं हे अवमूल्यन ? !

अवंती : असं सकाळपर्यंत हे सगळं बंद ठेवायचं म्हणजे गुदमरून मरायला होईल !

अक्षय : ते तसलं उत्सवाच्या नशेचं वीष पिऊन मरण्यापेक्षा ही शिक्षा मी मान्य करीन --

अवंती : तू म्हणतोस, ते वीष आहे म्हणून --

अक्षय : मग काय भक्ती आहे का ही ? भक्ती कशाला म्हणतात माहीत आहे का ? अहंकाराच्या समर्पणाला भक्ती म्हणतात -- इथं तर अहंकाराचीच करमणूक आणि नशा चाललीय ! ग्लानी आणणं चाललंय मनाला !

अवंती : कुणाच्याच मनात भक्ती नसेल कशावरून ? आणि या मिरवणुकीमुळं भक्ती निर्माणच होणार नाही हे तरी कशावरून ?

अक्षय : ही मिरवणूक पाहून जर कुणाची भक्ती जागी होणार असेल ना तर मग संजय दत्तची फायटिंग बघूनही

भक्ती जागी व्हायला पाहिजे.

अवंती : अरे पण आपला सांस्कृतिक वारसा आहे हा !

अक्षय : आणि मग भ्रष्टाचार, खून, डावपेच, हावरटपणा, अत्याचार -- हा कसला वारसा आहे ? वारसा हा सगळं मिळून असतो -- असं अर्धवट गोष्टीला वारसा म्हणून काय उपयोग ? संस्कृती ही सगळं मिळून एकत्र बघायची असते. आणि हे दोन्ही वारसे एकत्र का आहेत हाही प्रश्न पडायला हवा --

अवंती : तू शनिवारवाड्यावर उभा राहून हे सगळं बोल - मग बघ काय होतंय ते --

अक्षय : माझ्या डोक्यात -- माझ्या घरातही -- मी काही विचार करू नये -- असं कसं होईल ?

अवंती : माझं एकच म्हणणं आहे -- हे सगळं सुरू केलं टिळकांनी ! आणि ते काही अविचारी नव्हते !

अक्षय : आपण टिळकांचा हवाला देत बसण्यापेक्षा आपल्या डोक्याचं काय चाललंय ते पाहावं ! आणि आता या उत्सवात सामाजिक, राजकीय असं देशहिताचं काही उरलेलं नाहीय ! धर्माचा तर यात संबंधच नाही ! ( इथं डोअरबेल वाजते. अवंती जाऊन दार उघडते. दारातून अक्षयचा चुलतभाऊ समीर-- वय २९ -- त्याची पत्नी अश्विनी - वय सुमारे २५ आणि अक्षयची काकू म्हणजे समीरची आई वय सुमारे ६० सुहास्य वदनाने येतात. समीरच्या कडेवर सुमारे एक वर्षाचा मुलगा आहे. शिवाय हातात एक मोठा फुगा. त्या मुलाच्या आणि समीरच्या डोक्याला ' गणपती बाप्पा मोरया ! ' ही भगवी पट्टी बांधलेली. अंगावर गुलाल उडलेला. अश्विनीच्या हातात सूटकेस. काकूंना संधिवाताचा त्रास असल्याने त्या कशाबशा आत येऊन खाली बसतात, पाय पसरतात. अश्विनी सूटकेस ठेवते.)

अवंती : बसा ! ( अक्षयकडे सस्मित पाहते. )

समीर : अचानक ठरलं ! म्हटलं चला ! यांना सगळ्यांना मिरवणूक पाह्यची होती ! तुमचा फोन बंद आहे काय ? बराच ट्राय केला । सकाळी निघालो मग !

अवंती : अलिकडं आमच्या फोनचं काही खरं नाही -- बंद पडतो -- कम्प्लेंट द्यावी तर कुणी येऊन काही दुरुस्त केल्याशिवाय आपोआप चालूही होतो --

काकू : हिनं -- अश्विनीनं शंका काढली होती की अप्पा-वैनी नेहमी गणेशोत्सवात महाबळेश्वर नाहीतर लोणावळ्याला जातात तसे अक्षयभाऊजी आणि अवंतीवहिनी गेल्या नसल्या म्हणजे बरं ! म्हटलं, मला अक्षयचा स्वभाव माहीत आहे -- त्याला असं ट्रिपला जायला किंवा उगीचच कुठंतरी जाऊन राह्यला आवडत नाही -- तुझ्या भरंवशावर आले बाबा ! ( अवंती हसत स्वयंपाकघराकडे जाते. ) अप्पा-वैनी गेले असतील नं ?

अक्षय : लोणावळ्याला गेलेत ।

काकू : वाटलंच मला ! पण तुम्ही दोघं असणार ही खात्री होती !

अश्विनी : काल संध्याकाळी यानं रजा मंजूर करून घेतली ! उद्या जाणार आम्ही !

समीर : बरं, याला कुठे ठेवू ? ( अवंती पाण्याचे ग्लास घेऊन येते. तो ट्रे टीपॉयवर ठेवते.)

अवंती : ( समीरला--) आणा इकडं -- मी ठेवते -- पाणी घ्या तुम्ही -- ( ती कडेवरचं मूल आणि फुगा घेते. डाव्या बाजूच्या दारातून आतल्या खोलीकडे जाते. मागोमाग अश्विनी जाते. )

अक्षय : त्याच्या डोक्यावरची पट्टी सैल करा ती -- मेंदूचा रक्तपुरवठा साकळेल नाही तर -- ( समीरकडे पाहून --) तूही सैल कर -- मेंदू संभाळ बाबा !

काकू : आत्ता इथं घेतल्या त्या पट्टया ! रिक्षा घरापर्यंत कुठं येतीय ! चालत आले बाबा ! ( अक्षय उठून समीरला आणि काकूंना पाणी देतो. ) छान आहे बाबा ! तुम्ही पुण्यात आहात !

समीर : आणि तेसुध्दा लक्ष्मी रोडवर ! याला म्हणतात भाग्य ! ( समीर आणि काकू पाणी पितात -- समीर

दोन्ही ग्लास ट्रेमध्ये ठेवतो. ) पंखा लावू का ? ( इकडे तिकडे पाहून बटण चालू करतो. पंख्याच्या वाऱ्यात आनंदानं खुर्चीवर बसतो.) हे सगळं बंद का ठेवलंय ? ( अवंती आणि अश्विनी येतात.)

अवंती : गुलाल फार येतो हो घरात !

समीर : पण असं कोंदट नाही वाटत तुम्हाला ?

अवंती : वाटतं ना ! ( अश्विनीला --) हं -- आण दुधाची बाटली -- ( ती सूटकेसमधून काढून देते. ) या वर्षी इथनं कुणीही मिरवणूक बघायची नाही असं ठरलंय --

समीर : का -- नात्यातलं कोण गेलं बिलं का काय -- आम्हाला तर माहीत नाही --

अक्षय : कोणीही गेलेलं नाही -- आहेत सगळे !

समीर : ( अवंतीला) मग असं का ?

अवंती : ते अक्षयलाच विचारा -- फार सविस्तर सांगावं लागतं ते-- ते सांगताना त्यात तो म्हणेल की यानं मनं अतिरेकी होतात -- ते कसं म्हणाल तर तेही सविस्तर सांगितलं जाईल ! ( स्वयंपाकघराकडे जाते. समीर अक्षयकडे पाहतो.)

अक्षय : बंदच ठेवायचं ठरवलंय या वर्षी ! आम्हीही पाहणार नाही आणि दुसऱ्या कुणीही पाह्यचं नाही ! कित्येकांना नाही म्हणून सांगितलंय आम्ही ! आता हे बदलता येणार नाही. जोड्यानं मारतील लोक आम्हाला !

काकू : गणपती पाहिले म्हणून ?

अक्षय : नाही, ' नाही ' म्हणून पाहिले म्हणून !

काकू : अरे काय म्हणून म्हणून करत बसलायस -- काही घाबरू नको कुणाला --

अक्षय : घाबरत नाहीच आहे -- म्हणूनच तर --

समीर : आई, तो पुन्हा ' म्हणून ' म्हणाला !

काकू : ते जाऊ दे रे ! उगीच बारीक काहीतरी धरून बसू नये !

अश्विनी : मग असं का ठरवलं पण ?

अक्षय : मला हे असलं दर वर्षी आवडत नाही म्हणून !

काकू : ( समीर पाहतोय हे पाहून --) म्हणू दे ' म्हणून '। ( अक्षयला --) वर्षातनं एकदा येणारा सण असतो बाबा हा -- असं म्हणू नये -- ( अश्विनी सूटकेसमधून काढलेली एक पुडी घेऊन स्वयंपाकघराकडे जाते -- अवंती दुधाची बाटली घेऊन येते -- डावीकडे जाते --) एवढ्या मोठ्या देवाच्या उत्सवाला असं कध्धीही म्हणू नये रे बाबा -- ( अश्विनी येऊन बसते.)

अश्विनी : समीर म्हणालाच होता की हे कुणी नसले तर जरा वेळ मिरवणूक बघू आणि रिक्षानं परत स्टँडवर जाऊन एस्टी पकडू.

काकू : पण आहेत ना आता मग हे कशाला सांगायला हवंय ?

समीर : ( खिडकीकडे जात --) जाऊं दे -- उघड रे -- काही होत नाही --

अक्षय : अरे प्ली ऽज, काही होण्याचा प्रश्न नाही, पण आम्ही पुष्कळजणांना नाही म्हणून सांगितलंय -- संबंध फार बिघडतील आमचे – प्ली ऽ ज -- ( समीर पाहतो. परत येऊन बसतो. )

समीर : पण असं सांगितलंतच का तुम्ही ?

अक्षय : ' का ' असा शब्द घालून तुम्ही विचारणार आणि ' म्हणून ' असा शब्द न घालता मी उत्तर द्यायचं – कसं शक्य आहे ? !

समीर : बरं बोल !

अक्षय : लहर ! हो, लहरच माझी ! याहून जास्त मला काहीच बोलायचं नाही ! ( सगळे गप्प. )

अवंती : ( आतून येऊन खुर्चीवर बसत --) सांगायला सुरुवात तरी झाली की नाही ? ( समीर आणि काकूंकडे पाहून --) काकू तुम्हीसुध्दा न विचारणं बरं -- ऐका तुम्ही माझं -- कारणं ऐकायचा आग्रह धरलात नं तर मिरवणूक संपून जाईल तिकडे -- त्यापेक्षा काहीतरी खा, प्या आणि सरळ रस्त्यावर जाऊन बघा मिरवणूक --

अश्विनी : खाणंपिणं झालंय आमचं -- एस्टीतनं उतरल्यावर आधी ते केलं हॉटेलात -- या ट्रॅफिकमधनं घरी कधी पोचणार -- त्यात आईचं चालणं -- काही नको आत्ता --

अवंती : तुम्ही आपले सरळ खाली जा आणि बघा मिरवणूक -- माझ्या मावशीलासुध्दा येऊ नका म्हणून कळवलं --

काकू : मला नाही गं बाई जाता येणार -- मी आपली इथनंच पाहीन गॅलरीतनं -- या सांधेदुखीनं अगदी जीव खाल्लाय माझा -- ( पाय चोळत --) गणराया --

अक्षय : काकू, तू मला सांग की काय काय म्हणून साजरं करावं -- सगळे इतके सण -- घरातल्यांचे, नातेवाईकांचे, मित्रमैत्रिणींचे वाढदिवस, उद्‌घाटनं, निरनिराळे वर्षारंभ, ऑफीसचे, दुकानांचे वाढदिवस, नोकरी लागणं, प्रमोशन, मुलांच्या परीक्षांचे रिझल्ट, शिवाय खेळात पहिला, वक्तृत्वात पहिली, शिवाय सत्यनारायण, निरनिराळ्या शांती, रुद्र, मुंजी, साखरपुडे, लग्न, एकसष्ठ्या -- असं किती सांगू तुला -- हे सगळं रोगट नाही वाटत तुला ? आनंद हा सारखा असा बाहेरून ओरबाडून हावरटासारखा खात राहावा असं वाटणं हा वेडेपणा नाही वाटत ?

काकू : असं कसं म्हणतोस बाबा ! एकेकदाच येणारं असतं हे सगळं ! करायलाच पाहिजे !

समीर : हे सगळं सोडलं तर मग नुसतं रूटीन राहिलं -- कंटाळून वेडा होईल माणूस !

अवंती : अजून मी सांगते -- हा चर्चा रंगवण्यात पटाईत आहे -- असे फसू नका -- सरळ खाली जा --

काकू : मला नाही गं बाई जाता येणार -- मी आपली इथूनच पाहीन -- एखाद्या सांधेदुखी असलेल्या वयस्कर बाईला सूट दिली तर कुणी काही म्हणत नाही --

अवंती : मग तुमच्या नशीबात मिरवणूक बघणं नाही -- ( समीर आणि अश्विनीला -- ) तुम्ही जा --

काकू : आणि मग माझं काय गं ?

अवंती : तुम्हाला तर जाता येत नाहीय नं -- मग यांना तरी जाऊ द्या नं -- ( काकू सगळं हरवल्यासारख्या बघत राहतात.) जा तुम्ही -- अश्विनी, साकेत उठायचा नाही नं एवढ्यात ?

अश्विनी : ( केस, कपडे नीटनेटके करून उठत --) नाही -- मी जरा वॉश घेते --

समीर : काही नको, चल -- वॉश घ्यायला येऊ पुन्हा जरा वेळानं -- ( दोघंही निघतात -- )

अक्षय : समीर --

समीर : काय ?

अक्षय : फुगा कुठं ठेवला ?

समीर : आत ठेवला -- वहिनीनं --

अक्षय : हं -- जा -- ( ती दोघं जातात. ) बरोबर आहे, साकेतसाठी घेतला असेल ! ( अवंती जाऊन दार लावून येते --)

काकू : म्हणजे फक्त मलाच तुम्ही बघू देणार नाही -- कसलं गं हे घर तुमचं !

अक्षय : काकू, गणपतीनं तुला इथपर्यंत बोलावलं पण दर्शन देत नाही म्हणाला त्याला आम्ही काय करणार !

काकू : गणपती चाललेत बिचारे सरळ ! तुम्ही अडथळा करताय !

अवंती : मी नाही !

काकू : पण याचं तरी काय बिघडतंय ?

अवंती : विचारा आणि ऐका मग -- ( सरळ डाव्या खोलीकडे निघून जाते.)

काकू : असं का करतोस रे बाबा -- ( याचक नजर. अक्षय स्वस्थ बसलेला. अंधार होत जातो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा संध्याकाळचे सुमारे साडेसात. अक्षय दिवाणावर स्वस्थ डोळे मिटून पडलेला. अवंती काहीतरी वाचत खुर्चीवर बसलेली. काकू पाय चोळत बसलेल्या. असे काही क्षण गेल्यावर काकू हळूच उठतात. अवंती ' काय ' या अर्थी पाहते. त्या हातानं ' काही नाही, तू स्वस्थ बस ' अशी खूण करतात. हळूहळू पावलं टाकत खिडकीपर्यंत जातात. खिडकीखालच्या कट्ट्यावर बसतात. खिडकीच्या खालच्या दारावर एक कान टेकवतात. लगेच बाहेरचे ढोलताशांचे आवाज जरा स्पष्ट होतात. ' गणपतीबाप्पा -- मोरया !' आणि मग ' मोरया मोरया,मोरया,मोरया '-- हे ऐकत राहतात. अवंती, पाहून स्वत:शी स्मित करते आणि पुन्हा वाचू लागते. काही क्षणानी काकू खिडकीकडे पाहतात. खालची खिडकी घट्ट बंद केलेली असते. हे लक्षात आल्यावर काकू तिथून उठतात. आवाज पुन्हा सौम्य. हळूहळू दाराकडे जातात. मधे किंचित ठेचकळतात म्हणून अवंती पाहते. ' काही नाही ' अशी त्या हातानं खूण करतात. दारापर्यंत पोचल्यावर सावकाशपणे अक्षयकडे पाहतात. तो स्वस्थ झोपलेला. मग अगदी सावकाशपणे, आवाज होऊ नये याची काळजी घेत कडी काढतात. दार थोडं किलकिलं करतात. बाहेर पाहतात. दार थोडं जास्त उघडून दाराजवळच्या पायरीवर बसतात. आता अर्थात् अंधार पडलेला असून रोषणाईचे गणपती सुरू झालेले. ' दुपट्टेका पल्लू...' या किंवा तत्सम गाण्यावर नाचणारी रोषणाई. घरातही त्याचा प्रकाश आणि आवाज. त्या आवाजाने अक्षय जागा होतो. उठतो. काकूंकडे पाहतो. नंतर अवंतीकडे पाहतो. ती स्वस्थ वाचत बसलेली. उठून थेट दाराकडे जातो. दार लावतो.)

अक्षय : बघायचं नाही असं ठरलंय काकू ! असा चोरटेपणा तुझ्या वयाला शोभत नाही ! आणि तुझ्या धार्मिकपणालाही !

काकू : जागा कशाला झालास तू ? झोपून राहिला असतास तर तुला काही कळलं नसतं !

अवंती : काकू या इकडं तुम्ही -- तसा हेकेखोर आहे तो --

काकू : आता लगेच कसली येतेय गं बाई मी तिकडे --येईन जरा वेळानं --

अक्षय : मिरवणूक बघायचीच हा हेकेखोरपणा कुणाचा चाललाय ?

अवंती : हो, पण तुझ्या हेकेखोरपणानं या साध्या गोष्टीला हेकेखोरपणाचं रूप आलंय नं !

अक्षय : माझीही गोष्ट साधीच आहे !

अवंती : जग कुठल्या गोष्टीला नॉर्मल म्हणेल पण ?

अक्षय : मी नॉर्मल आहे आणि तुम्ही सगळे ॲब्नॉर्मल आहात हे मला स्पष्ट कळतंय -- मला तेवढं पुरे आहे -- ( दिवाणावर येऊन बसत --) आणि काकू -- नाही म्हणजे नाही -- तू कृपया अशी हावरट मन:स्थिती करून घेऊ नकोस --

अवंती : तूही त्रासू नकोस नं पण --

अक्षय : मी फक्त सांगतोय -- ( उठतो. डावीकडच्या खोलीतून एक छोटं कुलूप आणतो. ते दाबून दाराला बसवतो. किल्ली बुशशर्टच्या खिशात ठेवतो आणि येऊन बसतो.) आता प्रश्नच नाही -- आणि काकू, ती वरची खिडकी उघडायचा प्रयत्न करू नकोस -- धडपडशील कुठं तरी -- ते सांधेदुखीचं राहील बाजूला आणि दुसरंच उद्‌भवेल काहीतरी -- (अवंतीला--) आणि तुला सांगता येत नव्हतं ? दार उघडू नका म्हणून ?

अवंती : पुन्हा ’ म्हणून ’ म्हणालास ! ( तो पाहातो. मग पडतो -- स्वस्थ. काकू तिथूनच पाहाताहेत. )

काकू : भांडू नका गं बाई -- माझ्यामुळं तुमच्यांत भांडण नको ---( काही क्षणांनंतर-- ) किती कष्ट घेऊन आलो गं बाई आम्ही सोलापूरहून इथपर्यंत !-- जाऊं दे ! -- नशीब म्हणायचं ! आता पुन्हा कधी येणं होतंय, न होतंय, कोण जाणे !

अवंती : याल की ! काही होत नाही तुम्हाला ! हे वर्ष याचं झालं की पुढलं वर्ष आपलंच आहे ! आदल्या दिवसापासून या तुम्ही पुढल्या वर्षी ! माझ्या मावशीलाही कळवीन --

अक्षय : पुढल्या वर्षी मी रजा काढून माझ्या मित्राकडं साताऱ्याला जाईन --

काकू : अरे मग या वर्षीसुध्दा जाता आलं असतं की रे --

अक्षय : काकू, ही जी मनाला अशी हाव वाटतीय ना ती बरोबर आहे असं धरून चालण्यापेक्षा -- अशी स्थिती व्हायलाच पाहिजे का मनाची -- हे का नाही बघत तू ? अं ?

काकू : ते बघत बघतच जन्म गेला रे बाबा माझा ! ही आजच तेवढी संधी आहे --

अक्षय : मग जाऊं दे -- चाललेला जीवनप्रवाह उगीचच बिघडवू नकोस -- हाव धार्मिक नसते --

काकू : काय काय देखावे असतात म्हणे -- मोठमोठ्या मूर्ती असतात -- रोषणाई, ढोल, ताशे, लेझीम असतं म्हणे -- झांजा असतात -- गाणी -- काही बघायला नाही मिळणार -- रस्त्याच्या दुतर्फा खचाखच भरलेली सगळी भक्तमंडळी असतात म्हणे --

अक्षय : खिसापाकीट संभाळावं लागतं पण !

काकू : बंदोबस्त छान असतो म्हणे ! बघायचं होतं मला --

अवंती : पुढल्या वर्षी बघा तुम्ही -- अजून सुधारणा होईल -- ( डोअरबेल वाजते. अवंती जाऊन दार उघडते. बळवंतराव -- सुमारे ६२ पट्टेरी पायजमा आणि गंजीफ्रॉकमधे येतात. त्यांच्या हातात चटई आणि उशी. आत येतात. अवंती दार लावून येते. )

बळवंतराव: ( पाहून --) अरे वा, काकू आल्यात वाटतं -- नमस्कार काकू -- आमची ही म्हणाली की तुम्ही अक्षयकुमारांकडे जाऊन पडा -- हो, ती अक्षयकुमारच म्हणते तुला -- इथं रिकामं आहे म्हणाली सगळं -- छान केलंस तू हे ! -- आमच्याकडे सगळं हाऊसफुल्ल आहे -- कित्येक लोक जागा नाही म्हणून परत गेले -- घरचे लोक, आलेल्या लोकांचं खाणंपिणं चहापाणी बघतायत आणि हे बसलेयत सगळे मिरवणूक बघत -- तरी या वर्षी मी भरपूर फरसाण, चिवडा, बाकरवड्या आणि म्हैसूरपाक आणून ठेवलाय आणि भेळेचं सामान -- फक्त चहा कॉफी करायची मधनंमधनं -- एकदा मिळालेली जागा सोडत नाही शक्यतो कुणी -- कारण, गेली की गेली !

अक्षय : हं --

बळवंतराव: इथं टाकतो जरा चटई -- ( टाकतात. उशी ठेवतात. बसतात. डोअरबेल वाजते. अक्षय उठून जातो आणि दार उघडतो. समीर आणि अश्विनी येतात. समीरच्या हातात तीन आईस्क्रीम. )

अक्षय : हं, या -- शेजारचे बळवंतराव आलेत --

बळवंतराव: ( पाहून -- ) अरे वा, काकू, समीर, अश्विनी -- छान !

समीर : नमस्कार ! हे घ्या ! ( त्यांना एक आईस्क्रीम देतो. मग अवंतीला एक आणि अक्षयला एक देतो. काकू पाहताहेत --) आई, तीनच आणली होती -- मी पुन्हा खाली जाईन तेव्हा तुला घेऊन येईन -- आम्ही तिथंच उभं राहून खाल्लं आणि तुम्हाला तीन आणली -- पण -- ( काकू हावरटाप्रमाणे पाहताहेत-- )

अक्षय : माझं घे --

अवंती : माझं घ्या --

बळवंतराव: हे घ्या नाहीतर--

समीर : नको, नको -- मी आणतो म्हटलं ना -- घ्या तुम्ही -- ती एखादे वेळेस नको पण म्हणते --

अश्विनी : साकेत उठला नाही ना ?

अवंती : नाही -- ( तिघंही आईस्क्रीम खातात. काकू नाराज. )

समीर : मस्त आहेत पण देखावे ! रोषणाईसुध्दा फर्स्टक्लास आहे. आजूबाजूला खाण्याच्या पदार्थांचे, चहाकॉफीचे मुबलक स्टॉल्स आहेत -- फुटाफुटावर पोलीस आहेत -- आई, तू काळजी करू नकोस -- सोलापूरला गेल्यावर काय काय पाहिलं ते सगळं सांगीन मी तुला -- ( काकू बघतात मग स्वत:शी पुटपुटत दुसरीकडे बघतात. )

अक्षय : काही खास नसतं काकू ! तेच तेच असतं सगळं -- भ्रष्टाचार, साक्षरताप्रसार, दारूबंदी, किंवा पौराणिक किंवा ऐतिहासिक असतं काहीतरी -- बाजीप्रभू आणि पावनखिंड -- असलं काहीतरी -- किंवा कुंभकर्ण !

समीर : छान असतात पण ! कौशल्य कसलं जबरदस्त असतं त्यांच्यात ! हुबेहूब वाटतं अगदी --

अक्षय : हुबेहूब म्हणजे सवयीतलं झालं ! तेच ! नवीन काही असतं का ? जे सगळयांच्या डोक्यात असतं तेच पुन्हा पुन्हा काय बघायचं !

समीर : तसं तर मग जगातच कुठे काय नवीन असतं ?।

बळवंतराव: मला पटतं पण तुझं अक्षय ! लक्ष्मीरोडवर गॅलरी -- खिडकीचं घर असून आज तू इथं इतकी शांतता ठेवू शकलायस -- खरंच मी तुझ्या जिद्दीला दाद देतो -- शिवाय अवंतीलाही काही त्रास नाही --

अवंती : मला चालतो पण त्रास असा एखाददिवशी !

बळवंतराव: बरं अवंती, एक काम कर -- थोड्या वेळानं आमच्याकडे मोठ्या प्रमाणावर भेळ होणार आहे -- तेव्हा इकडे सांग काही डिश -- काकूंना चालते ना ?

काकू : ( रागावून – जोरात -- ) चालते !

बळवंतराव: हं, सांग मग सहा डिश -- ( अवंती दार उघडून जाते --) कॉफीही सांग नंतर --

समीर : आम्ही जाणार आहे जरा वेळानं -- आता मागचे थोडे बघून आलो त्यामुळे अर्धा तास तरी प्रश्न नाही --

अक्षय : एखादा बघायचा राहिला तर जिवाला धोका नको --

समीर : नाही, तसं नाही -- ( अवंती येते. )

अक्षय : चार गणपती सामील होणार होते ते काही कारणांनी सामीलच झालेले नाहीत मिरवणुकीत, त्यांचं काय करणार ? -- कसे बघणार ते --

समीर : ते तर कुणीच बघणार नाही नं -- तसं तर ही मिरवणूकसुध्दा आहे म्हणून बघायची -- नसतीच तर आपण काय बघितलं नाही हे कळायला काय मार्ग होता ?

अवंती : भाऊजी, त्याला उत्तरं देऊ नका, चुकून तो आपल्याला त्याच्या बाजूचं बोलायला लावतो --

समीर : असं झालं काय ?

अवंती : तो काय बोलेल ते ऐका नुसतं ! संभाषणाच्या फंदात पडू नका !

बळवंतराव: मान लिया हं पण अक्षय !

काकू : काय मान लिया ! सोलापूरहून आलोय आम्ही !

बळवंतराव: हां, ते आहे म्हणा ! ( अवंतीला -- ) सांगितलंस ना ?

अवंती : हो.

काकू : ( उठून एका बाजूला येत --) तिथं बसून आता काहीच उपयोग नाही -- आणि अवघडायला होतंय –

इकडं खालीच बसावं -- ( बसून पाय पसरतात. )

अश्विनी : मी जरा वॉश घेउन येते -- समीर तूही वॉश घे -- बरं वाटेल -- अजून फिरायचंय आपल्याला -- येताना बॅगेतला टावेल घेऊन ये -- ( ती जाते. मग टावेल घेऊन समीर जातो. काही क्षणांनी साकेतच्या रडण्याचा आवाज येतो म्हणून अवंती डावीकडे जाते. )

अक्षय : ( अवंती जात असताना -- ) ती पट्टी सैल कर त्याच्या डोक्यावरची ! मेंदू संभाळा !( ती जाते. )

बळवंतराव: पडतो एक जरा दहा मिनिटं -- ( ते चटईवर पडतात. अक्षय अविचल बसून. काकू त्याच्याकडे पाहात बसलेल्या. तो जणू काही एक अन्यायी, जुलुमी सत्ताधारी आहे अशा पध्दतीने. साकेतचा आवाज थांबलेला.)

अक्षय : ( काही क्षणांनंतर -- नजर न हलवता --) असं बघ ऽ त बसून काय होणार आहे ?

काकू : ( नजर वळवत -- ) कुठं काय --

अक्षय : मी उलट वेडं होण्यापासून वाचवतोय तुम्हाला --

काकू : तू त्या वेडापासून वाचवतोयस पण असंही वेडंच होण्याची शक्यता वाटतीय मला -- ( अवंती येते --) आता या पोरीनंच वाचवलं तर एक आशा आहे -- ( अवंती पाहते. अंधार होत जातो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा समोर अक्षय वाचत बसलेला. बळवंतराव, काकू आणि अवंती एका बाजूला बसलेले. बळवंतरावांजवळ दोनचार दिवसांची वर्तमानपत्रे. ते काकूंना देखावे वाचून दाखवताहेत.)

बळवंतराव: हं काकू, पुढं ऐका -- भोपळे चौकातील बाबूजी तरुण मंडळाने या वर्षी गणेशाची पृथ्वी प्रदक्षिणा या विषयावरील हलता देखावा सादर केला आहे. आपल्या आई-वडिलांतच सारे विश्व सामावले आहे असे सांगून व त्यांच्या भोवती प्रदक्षिणा घालून कार्तिकेयाबरोबरची स्पर्धा जिंकणाऱ्या गणेशाची कथा मंडळाने उत्कृष्टपणे सादर केली आहे. त्यात एकूण नऊ मूर्ती आहेत. ग्वाल्हेरच्या पार्वती डेकोरेटर्सने हा देखावा उभारला आहे.

काकू : बघायला पाहिजे होता ! ( अक्षय उठतो. डाव्या हाताला आत जातो. तिघेही एकमेकांकडे पाहतात. त्यांना काही कळत नाही. काही क्षणांनी तो येतो. टीव्ही केसला कुलूप लावून किल्ली खिशात टाकतो.)

अवंती : टीव्ही केसची किल्ली आणायला गेला होता. कुलूप लावलंन. लाईव्ह टेलेकास्ट बघू नये म्हणून.

अक्षय : लाईव्ह टेलेकास्ट बघायचा तर मग प्रत्यक्षच बघायला काय हरकत आहे ? --

काकू : ( आनंदाने--) होय ना ।

अक्षय : -- असं होईल -- म्हणून दोन्ही नको. आता प्रश्न नाही. माझं म्हणणं एवढंच आहे की आपण मिरवणूक बघून करमणूक करून घेतो -- आपण धार्मिक गोष्टीत भाग घेतला असं खोटं समाधान मिळवतो. कोण मिळवतं हे समाधान ? तर आपला अहंकार. त्यामुळं अहंकाराचं पोषण होतं. अहंकार सारखा असल्या सुखाची तीव्रता वाढवायचा प्रयत्न करत राहतो. त्यामुळं मग दु:खाचे प्रसंग आले की दु:खाचीही तीव्रता वाढवणारच. सुख हवं आणि दु:ख नको हेच असतं याच्यात ! याच्यातून अहंकार, हिंसक, अतिरेकी होत जातो ! ओम् शांती कुठली मग !

बळवंतराव: अरे पण मारामारीचे पिक्चर्स बघण्यापेक्षा चांगल असतं हे ! --

अक्षय : तसं काही नाही -- बाहेरनं सुख मिळवायचे सगळे प्रकार सारखेच -- दु:खही तसंच जोरात येणार मग ! -- टीव्ही सीरीयल्स बघता का ? सुखदु:खाच्या तीव्र प्रतिक्रिया द्याव्या लागतील अशा प्रसंगांनी भरलेल्या असतात त्या ! अहंकाराचं पोषण करणारा माल दिल्याशिवाय धंदा होत नाही --

अवंती : बरं ठीक आहे, बळवंतराव, पुढं वाचा.

बळवंतराव: लक्ष्मीपथावरच्या खंडोबा सार्वजनिक गणेशोत्सव मित्रमंडळाने वैष्णोदेवी काळभैरवाचा वध करीत

असल्याचा भव्य देखावा तयार केला आहे. देवी पाच सिंहांच्या रथावर आरूढ होऊन काळभैरवाला मारायला निघाली असल्याचे त्यात दाखविले आहे. शेजारीच काळभैरवाच्या मंदिरातील आरतीचे दृश्य आहे. एकोणीस मूर्तींच्या साहाय्याने हा देखावा उभा करताना कोल्हापूरचे अरविंद साळोखे यांनी मोठीच कल्पकता दाखविली आहे. दिव्यांची रचनाही आकर्षक आहे.

काकू : पाच सिंहांचा रथ ?

बळवंतराव: मलाही तेवढंच कळलंय यातलं काकू ! बरं, पुढं ऐका -- ( डोअरबेल वाजते. अवंती उठून दार उघडते. समीर, अश्विनी येतात.)

अश्विनी : बऱ्याच मार्गापर्यंत जाऊन पाहून आलो आम्ही. हे एवढे गणपती जाईपर्यंत आता तासभर तरी आराम आहे. पाय दुखवून घेत बसायचं कारण नाही. ( खुर्चीत बसते. समीरही बसतो. )

समीर : काय व्हरायटी असते पण ! ( काकासाहेब जोशी आत येतात. वय ६५. धोतर,शर्ट,काळी टोपी. )

जोशी : येऊ का आत ? आत आलोच आहे म्हणा !

अक्षय : या --

जोशी : आपली ओळख नाही. पण ओळख करून घ्यायला आलोय. मी मुळात इथं आलो कसा ते आधी सांगतो. तुमचे मित्र, नातेवाईक किंवा सहकारी यांच्यापैकी कुणीतरी तिसऱ्या एकाला तुमची माहिती दिली. तो तिसरा मला ओळखणारा आहे. ही माहिती मला उपयोगी आहे हे त्याच्या लगेच लक्षात आलं. म्हणून त्यानं हे मला सांगितलं. त्यामुळं मी इथं आलो.

समीर : कसली माहिती ? !

जोशी : हेच -- मिरवणूक -- आणि दारं बंद वगैरे. हे मला एकदम बेस्ट वाटलं. बरं, अक्षय शाळिग्राम कोण ?

समीर : ( अक्षयकडे बोट दाखवत -- ) हे -- हे !

जोशी : वा, वा ! आता आधी मी कोण ते सांगतो. मला ओळखणारे मला काकासाहेब जोशी म्हणतात. माझा एक प्रेस आहे. शिवाय मी एक साप्ताहिक चालवतो. ' साप्ताहिक भुक्कड ' ! म्हणजे साप्ताहिक भुक्कड नाही -- साप्ताहिकाचं नाव ' भुक्कड '! दर आठवड्याला समाजातल्या एका एका भुक्कड गोष्टीबद्दल मी लिहितो. ही मिरवणूक मात्र मी दरवर्षी कव्हर करतो. मागचं पान कोरं ठेवतो -- त्यामुळं त्याच्यावर लोक टेलिफोन नंबर्स, काही निरोप वगैरे लिहू शकतात. त्याच्यावर लिहिलेले टेलिफोन नंबर्स योग्य ठिकाणी उतरून घ्यायला लोकांना वेळ नसतो -- त्यामुळं अंक टिकतातही बऱ्यापैकी -- पाचशे प्रती काढतो -- फुकट वाटतो --

अक्षय : म्हणजे कसला तरी प्रचार करायचं समजाकार्य तुम्ही करता ! तुम्ही मूलतत्त्ववादी, फॅसिस्ट, कम्युनिस्ट, सेक्युलर, हिंदुत्ववादी, समाजवादी, गांधीवादी किंवा भांडवलशाहीवादी असलं काहीही असलात तरी मला त्याच्यात इंटरेस्ट नाही !

जोशी : तुम्ही कोण आहात मग ?

अक्षय : अं ? ( बावचळलेला. )

जोशी : नाही, नाही, असे गडबडू नका -- तुम्हाला मी कशाला टॉपल डाऊन करीन हो ?-- अक्षय शाळीग्राम ?!

अक्षय : हो.

जोशी : अहो, तुमचे तर विचार मला पटतात.

काकू : ( समीरला -- ) काय म्हणाले ते ?

समीर : टॉपल डाऊन म्हणजे कोलमडवणं -- कोलमडून पाडणं --

जोशी : माझ्या पोषाखावर जाऊ नका -- विशेषत: ही काळी टोपी -- वर्षानुवर्षं हा पोषाख आहे एवढंच -- विचार बदलले म्हणून टोपीही बदलली पाहिजे असं काही नाही -- गंमत म्हणजे मी हिंदुत्ववादी नाही !

समीर : मग ?

जोशी : भुक्कडपणाला प्रतिकार करणारा तुमच्यासारखा एकजण भेटला -- आनंद वाटला -- म्हणाल तर तुम्हाला मी नावानिशी पब्लिसिटी देऊ शकतो --

अक्षय : काही नको -- हे आमच्यापुरतं आहे --

जोशी : अहो, तुम्ही एखादी गोष्ट तत्त्व म्हणून आचरणात आणायला लागलात की ते आमच्यापुरतं असं म्हणून कसं चालेल? तुम्हाला ते सगळ्यांच्या हिताचं वाटतं ना ? मग तसं उघडपणे सांगायला नको ? बघा, तुमची मर्जी !

अक्षय : मी कुणाला काही शिकवायला निघालेलो नाही -- हे चाललंय याचा आणि धर्माचा काही संबंध नाही एवढंच माझं म्हणणं --

काकू : टोपीबिपी दिसली -- मला वाटलं काही देवाधर्माचं सांगतील ! उलटंच दिसतंय सगळं !

जोशी : या कोण आहेत -- रागावल्यायत वाटतं --

समीर : आई आहे ती माझी -- याची काकू -- याच्यामुळं तिला मिरवणूक बघायला मिळत नाहीय ! आणि तुम्ही त्याचीच बाजू घेताय --

जोशी : असं नाही काकू ! नका बघू एक वर्ष ! स्वतंत्र विचारांचा पुतण्या आहे तुमचा !

बळवंतराव: ( काकासाहेबाना--) काय हो, काही घातपात वगैरे होऊ शकतो का या मिरवणुकीत -- ?

जोशी : नाही होऊ शकणार. याच्यात जर का घातपात झाला तर ज्या दंगली उसळतील त्या सैन्यालासुध्दा कंट्रोल होणार नाहीत -- म्हणून उलट, घातपात होऊ नये म्हणून दोन्ही बाजूंचे लोक काळजी घेणार इथं -- माणूस हा असा, नाही ते उद्योग करत बसणारा प्राणी आहे -- पण त्यामुळं एकूण हिंदुत्ववाद्यांना एकी साधायला या मिरवणुकीचा उपयोग होतो एवढं खरं !

बळवंतराव: का ? -- धर्मनिरपेक्षतावादी पुढारीही खास दिल्लीहून येऊन सामील होतात की याच्यात !

जोशी : ते हिंदुत्ववाद फोफावू नये म्हणून ! आम्हीही हिंदूच आहोत पण हिंदुत्ववाद हा देशहिताचा नाही हे बिंबवायचं असतं त्यांना ! शिवाय ही मिरवणूक हिंदुत्ववाद्यांच्या हातात जाऊ नये याचीही काळजी घ्यायची असते ! याच्यातलीसुध्दा गंमत बघण्यासारखी आहे -- वीस टक्क्यांहून जास्त इतरधर्मीय असल्यामुळं -- म्हणजे आपल्या देशातलं म्हणतोय मी --फाळणीनंतर आपल्याला धर्मनिरपेक्षतावाद स्वीकारणं भागच होतं -- इतर धर्मीयांच्या मनात भीती येऊ नये म्हणून --आणि कधीकधी, भीतीमुळं ते हिंसकपणे वागले तरी, एक आश्वासक भूमिका ठेवणं भाग होतं -- पण याच आश्वासक भूमिकेच्या रागामुळं आणि तो राग पेटवत, भडकवत, त्यावर आधारित असं हिंदुत्ववाद्यांचं फावत गेलं आणि चिडून हिंदुत्ववाद फोफावत चालला ! म्हणजे दिसायला एकमेकांच्या विरुध्द दिसणाऱ्या गोष्टी कशा परस्परांना बळकटी देणाऱ्या असतात ते आलं ना लक्षात ! ही सगळी माणसाच्या वैचारिकपणातली गोची आहे. आपणच आपल्या विरुध्द जाणं !!

काकू : समीर, जाऊं दे ते -- कायकाय पाहिलंत ते सांगा -- हा आणखी ताप नको --

अक्षय : अहंकार हा बाहेरही विभाजन मानतो आणि स्वत:तही विभाजन मानतो -- त्यामुळं हे असंच होणार !

समीर : स्वत:त विभाजन ?

अक्षय : म्हणजे मी हिंदू आहे पण धर्मनिरपेक्षतावादी आहे किंवा मी हिंदुत्ववादी आहे पण न्यायी आहे -- असं ! असल्या मनांनी असंच होणार !

बळवंतराव: याच्या शिवाय आणखी वेगळं काय होऊ शकणार पण ?

अक्षय : आपण लोकशाही मानतो. स्वातंत्र्य, समता, बधुत्व, न्याय मानतो. एवढं पुरेसं नाही ? धार्मिक विभाजनावर आधारित असलेली ही तत्त्वं -- धर्मनिरपेक्षतावाद आणि हिंदुत्ववाद -- यांची काय गरज आहे ?

बळवंतराव: मग अनेक धर्म आहेत हे काय विसरून जायचं ?

अक्षय : स्वत:च्या मनाची विदीर्णता टाकणं आणि एकविध -- एकात्म होणं म्हणजेच धर्म -- हे संतांनी वारंवार स्पष्ट केलेलं आहे. याचा अर्थच असा की आपण स्वत: बदलायची तयारी असल्याशिवाय आणि तशी तीव्र निकड वाटल्याशिवाय धर्माशी आपला संबंधच येऊ शकत नाही ! ( इथं समीर बाकीच्यांच्यात जाऊन बसतो आणि गाणं सुरू करतो -- )

समीर: ( गात -- ) मेरी जिंदगी भी क्या एक कटी पतंग है --

अक्षय: ए, गप ! ( सगळे दचकतात.)

जोशी : मी स्वत:ला एक बुद्दू माणूस समजतो. कारण राजकारण्यांना आणि शासनकर्त्यांना समाजात इतकी ओंगळ प्रतिष्ठा का येते -- असे प्रश्न मला पडतात ! कुठली विचारसरणी समाजाला सर्वाधिक हितकारक आहे हे मला समजत नाही. त्यामुळं मला भुक्कड ते सगळं कळतं पण चांगलं म्हणजे काय ते माहीत नसतं ! त्यामुळं तसा मी फ्री असतो -- बुद्दू आणि फ्री !

अक्षय : मला हे आवडलं !

जोशी : तुम्ही कोणात्या पध्दतीनं वागताय हे सगळं ? कशासाठी ?

अक्षय : काकासाहेब, तुम्ही काय किंवा मी काय -- सदोदित प्रामाणिक राहणं -- पूर्णपणे -- शक्यच नाही. बऱ्याच वेळा, शक्य तितकं -- एवढं जमू शकतं. मी फुटकळच आहे, पण बाकीचेही फुटकळच आहेत की ! मग मला शक्य तेव्हा माझ्या समजुतीप्रमाणे वागू द्या की ! माणूस दु:खी होण्याची पध्दत जर जगभर एकच आहे तर त्यातून बाहेर पडण्याची शक्यता म्हणजे धर्म -- एकच असला पाहिजे. अनेक धर्म कसे असतील ? आणि धर्मात गर्दीचं काय काम ? स्वत:ला एकटं पाडण्याचं काम प्रत्येकानं स्वत: केलेलं आहे ; तसंच तो एकटेपणा टाकणंही प्रत्येकाला स्वत:ला करावं लागेल. गर्दी, प्रदर्शन, उन्मत्तपणा यांचा धर्माशी काहीही संबंध नाही -- हे मला स्वच्छपणे पटतं. या मार्गानं मला धर्म समजावा असं वाटतं पण अजून समजलेला नाही. आणि समजेपर्यंत काहीच कृती करू नये असं तर शक्य नाही. म्हणून ही कृती आहे.

जोशी : वारे वा ! व्हेरी गुड ! धर्माच्या बाबतीत मी एवढी काही म्हणजे फारशी उत्सुकता अद्याप तरी बाळगलेली नाही. पण विचारसरणी कुठली चांगली अशी एक उत्सुकता मला असायची !

बळवंतराव: म्हणजे आता तीही नाही !

जोशी : आमच्या साप्ताहिकाचं नाव लक्षात आहे नं ? बास ! छान वाटलं ! धर्माच्या बाबतीत मला वाटणारी एक गोष्ट सांगतो. धर्माचं म्हणजे, आता बघा तुम्ही, हे गणपतीचे मंडप उठले की लगेच नवरात्राचे -- देवींचे मंडप पडतील. हेही मंडप आता वाढायला लागलेत. मला तर वाटतं की पहिले मंडप काढणं आणि दुसरे उभे करणं हा त्रास घेऊच नये. कायम सगळीकडे मंडप उभारलेलेच ठेवावे, त्यातल्या देवदेवतांच्या मूर्ती बदलून वर्गण्या गोळा करणं चालू ठेवावं आणि सगळीकडनं कायमचा ट्रॅफिक जॅम करून ठेवावा ! म्हणजे मग, निरक्षरता, गरिबी, बेकारी या गोष्टी अस्तित्वातच नाहीत असं होऊन जाईल मस्त ! आणि सगळे लोक अधिकाधिक धार्मिक होत राहतील !( क्षणभरानं -- ) पाय धरणं म्हणजे प्रदर्शन होईल आणि खोटं पडेल, म्हणून नको -- ( उभे राहून अक्षयचा हात हातात घेऊन -- ) पण

मनापासून आपुलकी वाटली ! अच्छा ! चलतो ! आणि काकू या वर्षी तुमचा हट्ट नका चालवू ! जाऊं द्या ! हे चांगल काहीतरी घडतंय ते घडू द्या ! ( जातात. )

काकू : ( फणकाऱ्यानं --) हे ! चांगलं ! ( स्वत:शी -- ) दोघांनाही मेल्यांना कळत तर काहीच नाही !

बळवंतराव: जाऊं द्या काकू, तुम्ही उगीच त्रागा नका करून घेऊ !

अक्षय : मी आता आत बसतो जरा वाचत -- ( उठतो आणि डाव्या हाताच्या दारातून आत जातो. )

काकू : ( अवंतीला -- ) रोज झोपतो किती वाजता हा ?

अवंती : वेळ होऊन गेलीय -- खाणी झाल्यामुळं आता जेवणाचाही प्रश्न नाही --

काकू : म्हणजे आता वाचता वाचता झोपेल ?

बळवंतराव: काय म्हातारीला सतावताय राव, बघू द्या की --

अवंती : अक्षयला सांगा.

अश्विनी : काही नको. त्यांचा निर्णय पक्का दिसतोय -- आणि आपलं डोकं जड झालेलं आपल्याला कळतंय --

काकू : ती वरची खिडकी उघडता येऊ शकते -- पण उभं राहून बघावं लागेल -- खालची नाही उघडता येत ?

अवंती : येते, पण रस्त्यावरनं घरातलं दिसू नये म्हणून बाहेरच्या कठड्याला तेवढ्या भागात पत्रा मारलेला आहे. ( आत जाते. )

समीर : जाऊं दे ना आई, मी सांगीन तुला सगळं --

काकू : म्हणजे आणखी वाईट वाटायला ! प्रत्यक्ष बघितल्याशिवाय काय आनंद मिळणाराय !

समीर : पण करणार काय आता ?

काकू : काहीतरी कर बाबा.

समीर : येतीस का खाली हळूहळू ?

काकू : आणि पुन्हा वर यायचं ? त्या रिक्षानं सोडलं तिथपासून इथपर्यंत मी कशी आले ते दिसलंच आहे तुला ! निव्वळ जिद्दीवर आले ! म्हटलं घरातनंच दिसतंय, बघून घ्यू ! पुढल्या वर्षीचं कुणी बघितलंय !

अक्षय : ( प्रवेश करून -- ) या वरच्या खिडकीला कुलूप लावलेलं नाहीय कारण नाहीय तसं कुलूप त्याच्यात बसणारं -- उघडायची नाही हं ! ( जातो. )

काकू : एवढं सांगण्यासाठी आला बिचारा !

बळवंतराव: मोठा कठीण आहे प्रॉब्लेम !

काकू : जाऊं दे मग -- चल -- जाऊ या सोलापूरला -- इथं बसून हळहळत बसण्यापेक्षा --

समीर : अगं पण आल्यासारखं आम्हाला बघू दे की आता -- आम्हाला छान मजा वाटतीय --

काकू : हे, आणखी वर ! -- तुम्ही काय पुढल्या वर्षीसुध्दा बघू शकाल -- मला कशाला मग हा सगळा त्रास ?

समीर : टीव्हीवर तरी बघता आलं असतं तेही चुकलं तुझं ! हेही नाही आणि तेही नाही ! आणि खरं तर जाऊ या, जाऊ या म्हणून तूच मागं लागलेली होतीस -- पण नशिबात नाही तुझ्या -- आमच्या आहे --

काकू : आता मला काय माहीत हा असले विचार करत बसतो म्हणून ! चारचौघांसारखं असावं माणसानं !

अश्विनी : आपल्याला आपलं खरं वाटतं की नाही तसं त्यांना त्यांचं खरं वाटत असेल.

काकू : हं, गप ! मला शिकवतीय !

अश्विनी : अहो, शिकवत नाहीय मी --

बळवंतराव: मी सकाळी उद्‌घाटनाला जाऊन आलो मिरवणुकीच्या ! बरोब्बर बारा म्हणजे बाराला सुरू झाली

मिरवणूक -- महापौरांनी पूजा केल्यानंतर -- म्हणजे पहिला मानाचा कसबा गणपती -- त्याची ! किती पुढारी ! झाडून सगळे ! गुलाल किती उधळला ! पुण्यात या उत्सवाला दीडशे ते पावणेदोनशे टन नुसता गुलाल लागतो म्हणे -- म्हणजे बाकीचा सगळा मिळून किती करोडोंनी धंदा होत असेल विचार करा ! आणि यंदा एक नवीन बघितलं -- पूर्वी सारखे मधेमधे फोटोग्राफर यायचे नं -- तसं नव्हतं -- त्यांच्यासाठी एक असं उंचावर मचाण बांधलं होतं -- म्हणजे हा असा इथं गणपती -- आणि इथं वर मचाण -- असं --

समीर : नाचातल्यासारखी पोझ दिसतीय तुमची । सरळ व्हा ! ( बळवंतराव नकळत झालेली पोझ सोडतात.) बरं नाही दिसत ते ! ( काकू अजून बळवंतरावांकडे बघताहेत हे पाहून --) झालं सांगून आई त्यांचं !

काकू : ( त्याच्याकडे पाहात ) हं --

बळवंतराव: अहो मिरवणूक जर उशिरा सुरू झाली -- महापौर उशिरा आल्यामुळं -- तर मिरवणूक लांबल्यावर लोक त्यांनाच दोष देणार ! त्यामुळं एरवी सगळीकडं उशिरा जात असले तरी इथं वेळेवर येतात ! पब्लिसिटी असते ना ! मोठी ! ( साकेतच्या रडण्याचा आवाज येतो.)

अश्विनी : ( उठत-- ) -- बघून येते -- बहुतेक कपडे बदलावे लागतील -- ( जाते. )

समीर : यांच्या घरातून बघता येईल का आईला ?

बळवंतराव: आमच्या ? मग मीच म्हटलं नसतं ? -- शक्यच नाही -- अहो इथंसुध्दा यांनी या वर्षी बंद ठेवायचं ठरवलंय म्हणून, नाहीतर इथूनही शक्य झालं नसतं -- बायका, पोरं, मोठी माणसं -- सगळं खचाखच भरलेलं असतं -- आणि यांना जागाही जरा जास्त लागणार -- पाय पसरून बसायला -- कुणाकुणाला बाहेर काढणार ? आणि वाईटपणा कोण घेणार ? आणि या वेळी एवढा त्याग तरी कोण करणार हो ? बरं, टीव्हीचं म्हणाल तर आमच्या टीव्हीला केबल नाही ! ( अश्विनी येते. नंतर अवंती येते -- सगळे उत्सुकतेने बघतायत. )

अश्विनी : वाचत बसलेत -- ( काकू निराश. काही क्षणांनी हळू आवाजात अवंतीला -- ) कठीण आहे पण यांच्याबरोबर जीवन कंठणं -- समीरच्या समंजसपणामुळं जमतंय -- थोरल्या भाऊजींकडे आवडत नाही यांना -- आम्ही दोघंही बरे मऊ पडतो ना --

समीर : अगं वैनी, ही म्हणते नं माझा समंजसपणा तो खरं तर कंपल्सरी समंजसपणा आहे -- असं जास्त वर्षं समंजस राहावं लागलं ना तर डोकं आऊट होईल !--

बळवंतराव: ( सगळ्यांना --) एक करता येईल -- माझ्याकडं झोपेच्या गोळ्या आहेत -- एक गोळी देऊ कॉफीत मिसळून -- तो झोपल्यावर जमवू --

अवंती : नको -- झोपेची गोळी त्यानं कधी घेतलेली नाही -- काही भलंबुरं झालं म्हणजे ! -- डॉक्टरांना विचारल्याशिवाय नको --

बळवंतराव: मग आता एकच राहिलं -- मी न् समीर त्याला एकेका बाजूनं धरून ठेवतो -- तुम्ही किल्ली घ्या काढून –- आम्ही तसंच त्याला धरून ठेवतो -- बघू दे मग यांना --

अवंती : मला तरी हे पटत नाही -- मग माझ्या मावशीलाही बोलावता आलं नसतं ? आणि किती झालं तरी माझा नवरा आहे तो -- असलं नको !( काकू नुसत्याच एकदा बळवंतरावांकडे, एकदा अवंतीकडे अशा पाहतात. काहीच जमत नाही हे पाहिल्यावर रडायला सुरूवात करतात ...)

काकू : ( रडत -- ) नशिबातच नाही माझ्या ...

( इथे अंधार होत जातो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा तो अगदी मंद आहे. काकू, बळवंतराव खाली -- काकू मागे -- बळवंतराव पुढे असे झोपलेले. अवंती दिवाणावर झोपलेली. काकू उठतात -- त्यांच्यावर स्पॉट. काकूंच्या समोर काही अंतरावर एक लाल स्पॉट.)

काकू : उठा, उठा -- गणपती आलाय -- ( बळवंतराव उठतात.) -- अवंती -- गणपती आलाय -- ( अवंती जागी होते. ती आणि बळवंतराव एकेका बाजूने काकूंजवळ येतात --) -- गणपती आलाय -- स्वत: --

बळवंतराव: ( काकू लाल स्पॉटच्या दिशेने पाहताहेत तिकडे पाहात --) गणपती ? कुठाय ? काय वरबीर देतोय का विचारा -- दार तेवढं उघडून दे म्हणावं गॅलरीचं -- नाहीतर अक्षयला चांगली बुध्दी तरी दे म्हणावं --

अवंती : ही मिरवणूक त्याचीच चाललीय का ते बिचारा बरं --

बळवंतराव: रोषणाई आहे का ?

काकू : माझी तळमळ पाहून आलो म्हणतोय --

बळवंतराव: वर देतोय का विचारा --

काकू : गाणं चाललंय -- (' ये लडका आँख मारे ' सुरू होतं -- त्या लयीवर लाल स्पॉट कमी जास्त होत राहतो -- ) -- ये लडका आँख मारे -- मला मिरवणूक बघायचीय -- मला मिरवणूक बघायचीय --

बळवंतराव: सांगितलंन ? काय म्हणतोय ?

अवंती : तो स्वत: जातीनं दर्शन देतोय तर मिरवणुकीचं कशाला विचारताय ? -- तेज दिसतंय का ?

काकू : तेज आहे पण रोषणाई नाहीय --

बळवंतराव आता सध्या समोरनं-- रस्त्यावरनं कोणता गणपती चाललाय विचारा बरं --

अवंती: आम्ही फ्लॅटचे पैसे भरतोय दोन वर्षं -- मूल होऊ द्यायचं नंतर पाहू म्हणतोय अक्षय -- ते विचारा बरं --

काकू : मी काही विचारायच्या आधीच तुम्ही पुढचं विचारताय --

अवंती : बरं फक्त आपल्या सगळ्यांच्या सगळ्या इच्छा पूर्ण होतील का विचारा -- म्हणजे मग सगळंच आलं त्यात --

बळवंतराव: तू खरा गणपती आहेस का नुसता भास आहेस -- हे आधी विचारून घ्या -- मग बाकीचं विचारा -- खात्री पटवून घ्या आधी --

काकू : छान दिसतोय गणपती -- पण देखावा नाहीय --

अवंती : तुम्ही विचारत तर काहीच नाही -- आयता आलाय तर -- पण एक बरं झालं -- त्या निमित्तानं आमच्या घराला पाय लागले त्याचे --

काकू: मला मिरवणूक बघायचीय गणेशा -- तुझीच मिरवणूक रे बाबा -- मिळेल ना बघायला ?( अचानक लाल स्पॉट जातो. ) गणेशा -- गणेशा -- ( काकूंवरचा स्पॉटही जातो तसतसा जनरल प्रकाश. काकूंच्या बाजूला अवंती आणि बळवंतराव. )

अवंती : काय झालं काकू ?

बळवंतराव: टेन्शन आलं असणार त्यांना --

काकू : ( जणू भानावर येत -- ) गणेश आला होता -- गणपती !

बळवंतराव: आम्हाला वाटलं तुम्ही स्वप्नातलं बोलताय --

अवंती : म्हणजे दिसला तुम्हाला ?

काकू : गेला पण -- एकदम अदृश्य झाला --

अवंती : काय म्हणाला काय पण ?

काकू : तो काही म्हणायच्या आधी तुम्हीच सारखे अडथळे आणत होता --

अवंती : कोण ?

काकू : तू आणि बळवंतराव --

बळवंतराव: अहो, नुसतं काय विचारा ते सांगत होतो काकू -- नंतर राहिलं असं नको म्हणून -- ( अक्षय येतो.)

अक्षय : हं -- काय झालं ?

अवंती : काकू म्हणताहेत की गणपती आला होता म्हणे इथं घरात -- दिसला त्यांना --

अक्षय : हं -- ( जायला लागतो. )

काकू : ( ओरडतात --) खरंच आला होता ! खोटं बोलतेय मी ?

अक्षय : असेल, असेल --

काकू : ( ओरडून -- ) आलाच होता ! ( दोन क्षण शांतता.) नुसतं स्वतःच्या मताप्रमाणे वागणं ! शी ! ( अक्षय क्षणभर बघतो. ) दुसऱ्याच्या मनाचा काही विचार नाही, काही नाही !--

अक्षय : ( क्षणभरानं -- ) बरं ठीक आहे -- तुम्हाला असं वाटतंय नं की हे फक्त तुमच्या मनाविरुध्द आणि माझ्या मनाला आवडणारं चाललंय ! अं ! मग एक करतो -- माझ्याही मनाविरुध्द होऊ दे -- मी बघतो मिरवणूक -- ( खिशातून दाराची किल्ली काढत जाऊन दार उघडतो -- मिरवणूकीचा दणका, उजेड -- काकू उठू लागतात ते पाहून --) अंहं -- बाकी कुणी नाही -- फक्त माझ्या मनाविरुध्द होऊ दे --

काकू : दु:खावर डागण्या देणं झालं हे ! -- कसा बघतोय मजेत ! -- ( दणका चालू .. पडदा पडत जातो... )

**--- अंक पहिला समाप्त ---**

## --- अंक दुसरा ---

( पहिला अंक संपला तिथूनच पुढे चालू. पडदा उघडण्यापूर्वी वाद्यांचा दणका, मिरवणुकीतले आवाज इ. पडदा उघडत जातो. अक्षय गॅलरीकडच्या दारात उभा असून रोषणाईचा प्रकाश आतही येतो आहे.. )

काकू : दु:खावर डागण्या देणं झालं हे ! -- कसा बघतोय मजेत ! --

अक्षय : काकू, फक्त तुमच्या मनाविरुध्द नको -- माझ्याही मनाविरुध्द होऊ दे -- म्हणून बघतोय मी मिरवणूक -- सगळ्यांच्याच मनाविरुध्द होऊ दे -- आता काय प्रश्न आहे --

काकू : पण तुला बघायला मिळतीय ना मिरवणूक त्यामुळं !

बळवंतराव: ( हळूच -- काकूंना -- ) काकू, काही बोलू नका आता -- निदान आवाज तर चांगला यायला लागला ! –– उजेड तर दिसायला लागला !

काकू : ( मोठ्यांदा – अक्षयला --) बरं ठीक आहे -- निदान आता तो आवाज आणि उजेड तरी राहूं दे ! -- (अक्षय क्षणभर पाहून दार लावून टाकतो आणि कुलूप लावून किल्ली खिशात टाकतो.) -- का ? असं का ?

अक्षय : इथून या मिरवणुकीचा कसलाच आनंद कुणीही घ्यायचा नाही असं ठरलंय ! हे असं नाही चालणार ! मग लोकांना येऊ द्यायला काय हरकत होती ! ? लोकांची अशी फसवणूक मी होऊ देणार नाही !

काकू : फसवणूक वाईट आणि अडवणूक चांगली कशी ? ( अवंती आत जाते. अक्षय दोन्ही हात मानेमागे धरून आणि पुढे ओढलेल्या दुसऱ्या खुर्चीवर पाय ठेवून, खुर्चीवर बसतो. काकू आणि बळवंतराव अक्षयकडे पाहात राहतात. काही क्षण असे गेल्यावर -- )

बळवंतराव: अक्षय, तुझं मला पटतं -- हा एवढा गोंधळ घरात करायचा की नाही हे आपल्यासुध्दा थोडं हातात पाहिजेच -- या तुझ्या तत्त्वामुळंच मला निदान इथं येऊन जरा पडता तरी आलं -- पण मी काय म्हणतो, दुसऱ्या बाजूनं बघितलं तर तेही बरोबर वाटतं रे -- म्हणजे बघ -- हा एवढा झगमगाट, इतके तालबध्द -- मेंदू बधीर करणारे आवाज, आपल्या संस्कृतीच्या आठवणी जागवणारे इतके असंख्य आणि सुंदर देखावे, इतके रंगीबेरंगी प्रकाश -- हे सगळं एरवी कधी बघायला मिळणार रे ? -- इतकं उत्साही वातावरण ? आणि जिथं डोकं टेकवावं अशा आपल्या दैवाताच्या असंख्य रूपांतल्या मूर्ती ?

अक्षय : हं --

बळवंतराव: हा अनुभव घ्यावा असं वाटणं यात काय चूक आहे सांग बरं -- ( काकू चेहऱ्यावर फारसे एक्स्प्रेशन न देता अक्षयकडे पाहताहेत -- ) सांग नं -- काय चूक आहे याच्यात --

अक्षय : हं --

बळवंतराव: इतकी प्रचंड गर्दी तरी मूर्ख कशी म्हणावी ?

अक्षय : हं --

बळवंतराव: मी सांगत नाहीय -- विचारतोय --

अक्षय : सगळ्यांनी मिळून एखादी सवय लावून घेतली की लागते -- गर्दी म्हणजे बरोबर हे डोक्यातनं काढून टाका -- रेसकोर्सवर, पुढाऱ्यांच्या भाषणांनाही गर्दी असते ! बार्समधेही गर्दी असते !

बळवंतराव: अशी अठ्ठावीस तास चालणारी मिरवणूक जगात कुठं आहे दुसरीकडं ? दर वर्षी ?

अक्षय : ते आहे म्हणा !

बळवंतराव: आणि तू म्हणतोस नुसती सवय ! आणि अशी प्रचंडपणाचीसुध्दा एखादी सवय का असू नये ?

अक्षय : असला किरकोळ प्रचंडपणा कशाला सांगताय ! तसं तर एवढ्या प्रचंड जगात सतत जगतोय की आपण !

बळवंतराव: पण असा जाणवतो का तो प्रचंडपणा ? ( अक्षय गप्प.) आमच्याकडे, तुला सांगतो, बरं का काकू, नातेवाईक,ओळखीची कुटुंबं, मुलांच्या मित्रमैत्रिणी -- हे आधीपासून बुकिंग करतात या मिरवणुकीचं -- पुढं 'हाऊसफुल्ल ' म्हणून सांगावं लागतं -- आणि हिलासुध्दा हौस आहे -- इतक्या लोकांचं आदरातिथ्य, खाणंपिणं, बिनतक्रार, आनंदानं करते -- आलेल्या बायकाही मदत करतात म्हणा -- पण अशा वागण्यामुळं तिला मान आहे सगळीकडं -- आणि मलाही --

अक्षय : मला हे सगळं दयनीय वाटतं !

बळवंतराव: दयनीय ?

अक्षय : नाईलाजानं प्रवाहपतित होणं आणि नंतर आपण प्रवाहपतित झालोय हे विसरणं !

काकू : ( चिडून -- ) त्याला काही सांगून उपयोग नाही !

बळवंतराव: हे बघ, समज तुला देवाच्या दर्शनाची आवश्यकता वाटत नाही, अं, तर देव दिसला तरी तुला फरक पडत नाही. पण समज ज्याला दर्शनाची आवश्यकता आहे, त्याला तो दिसायलाच लागतो नं !

अक्षय : हो, पण त्यानं मला त्रास द्यायचा नाही, मी त्याला त्रास देत नाही -- खलास ।

काकू : ( चिडून -- ) ख्यलाश ! तुला तरी काय कळतंय रे धर्मातलं ? तू काय संत आहेस ?

अक्षय : नाही. आपल्याला, कुणालाच काही कळत नाही. आपण सारखेच आहोत, एवढं झालं तरी पुरे ! पण एकमेकांच्या विरुध्द आहोत हे नक्की !

बळवंतराव: पण काकू, एक लक्षात घ्या, मिरवणुकीला जायचंच असा हटवादीपणा करणारे लोक असले तरी मिरवणूक बघताच कामा नये असला हटवादीपणा अक्षय करणार नाही ! म्हणजे असं मला एक आपलं वाटतं ! ( डोअरबेल वाजते. अक्षय उठून दरवाजा उघडतो. समीर,अश्विनी आत येतात. त्या दोघांचे प्रफुल्लित चेहरे. अक्षय दार लावून येऊन बसतो. )

समीर : सुमारे दीड ते दोन तासात बाबूशेठ सोनारचा गणपती येतोय बघ इथं ! पारणं फिटतंय डोळ्यांचं !

अश्विनी : आम्ही असंच करतोय -- मागंपर्यंत जाऊन बघून यायचे गणपती -- आणि मग तुळशीबागेकडून, कुमठेकर रस्त्यानं इकडं येऊन मग इथं पोचायचं ! म्हणजे मग दीडेक तास लागतो -- ते गणपती संपायला !

समीर : ( अक्षयला -- उत्साहानं --) तुला सांगतो --

काकू : ( संतापून -- ) बंद !

समीर : का ?

काकू : सारखं मधेमधे येऊन इथं काही सांगायचं नाही --

समीर : म्हणजे यानं तुझा बघायचा आनंद घालवला तसा तू आमचा सांगायचा घालवणार ! --

काकू : तुम्ही काय मला खिजवायला सांगायला येता ?

समीर : ( अश्विनीला --) बघ ! म्हणजे सद्भावनेची ही किंमत !

अश्विनी : जाऊं दे रे -- ( अवंती डावीकडून येते. केस नीट करते. ) झोपलीवतीस वाटतं ? साकेत ?

अवंती : काही नाही -- मधे एकदा दूध दिलं --

समीर : पण सालं एक होतंय बरं का -- एखाद्या सणाच्या -- उत्सवाच्या वेळी नात्यातलं कुणी तरी इंटेन्सिव्ह केअर युनिटमध्ये असावं तसं वाटतं इथं येताना -- आख्ख्या पुण्यात असं घर नसेल !

अक्षय : मला असल्या हपापण्याच्या सवयी नकोयत !

काकू : ( चिडून -- ) देवासाठी हपापलेलंच पाहिजे -- तळमळच पाहिजे ! तुला नाही कळायचं ते ! पंढरपूरला हजारो लोक चालत जातात एकादशीला ! तळमळ, आच असल्याशिवाय होत नसतं हे !

अक्षय : मी तुम्हाला काही म्हणतोय का ? का चिडतोय तुमच्यावर ? तुम्ही जा नं चालत, मी कुठं काय म्हणतोय -- आणि दुसरं म्हणजे भक्तीचीही तळमळ असते आणि करमणूक करून घेण्याचीही भिकारडी तळमळच असते -- आपली कुठली आहे तेही पाहावं माणसानं ! आणि या बाबतीत एक लक्षात घ्या -- धर्म समजण्यासाठी सायास करणं, स्वत:चे हाल करणं, किंवा कोणतेही कष्ट-क्लेष भोगणं -- याची काहीही आवश्यकता नाही -- असं संतांनी म्हटलेलं आहे. गौतम बुध्दानंही हेच सांगितलेलं आहे. पण तुम्ही इकडं लक्ष दिलंत तर तुमचे आवडते डोलारे कोसळतील. त्यापेक्षा आहेत ते भ्रम चालू ठेवा तुम्ही !--

समीर : समाजाच्या प्रवाहाला असा अडथळा झालास तर त्याचा भोवरा तयार होईल !-- समजून घे --

अक्षय : मला याच्यावर काही बोलायचं नाही.

समीर : वहिनी, तुला पटतं हे याचं वागणं ?

अवंती : पटतंही आणि पटत नाहीही.

समीर : म्हणजे ?

अवंती : दर वर्षी तो गोंधळ घालण्यापेक्षा एक वर्षा आड बरं आहे --

काकू : म्हणजे तुझाही पाठिंबा आहे याला ! --

अवंती : माझ्यावर नका आणू ! माझ्या मावशीला जरी येऊ नको असं कळवलं असलं तरी तुम्हाला बघू द्यायला माझा विरोध नाही -- तुमचा पुतण्या न् तुम्ही बघून घ्या --

समीर : म्हणजे च्यायला हे फक्त काकू-पुतण्या युध्दच उभं राहिलंय ! ( अक्षयला -- ) काय म्हातारीला हरवण्यात तुला मर्दुमकी वाटते एवढी ?

अक्षय : अजिबात नाही ! माझं कुणाशीही युध्द नाही -- आपण एकमेकांच्या विरुध्द असलो तरी --

काकू : ( समीरला -- ) तो मोकळा फटिंग आहे नुसता -- त्याच्या नादी नको लागूस !

अवंती : मघाशी काकूंना इथं गणपती दिसला !

समीर : कुठं इथं ? घरात ?

अवंती : हो, त्या जरा पडल्या होत्या तर दर्शन झालं त्यांना -- तळमळ पाहून आलो असं त्यांना म्हणाला तो --

समीर : आई ! खरं ! ?

काकू : हो --

समीर : च्यायला बघा, आम्ही दगडामातीचे गणपती बघत फिरतोय, तर हिला घरबसल्या प्रत्यक्ष दर्शन ! काय करायचीय ती मिरवणूक !

काकू : स्वप्न असेल ते माझं ! मिरवणूक बघणं वेगळं ! ती बघायलाच पाहिजे !

बळवंतराव: मिरवणूक बघायची इच्छा राहणारच हो ! आणि देवाचीच तर आहे मिरवणूक !

अक्षय : देव वेगळा, त्याची मिरवणूक वेगळी !

काकू : (समीरला --) हे पटल्यामुळं तो असं बोलतोय असं समजू नकोस -- नंतर तो दुसरंच काहीतरी बोलतो --

समीर : बरं, ते जाऊं दे -- तुझं चूक आहे असं आम्ही म्हणत नाही -- पण तेवढा एक गणपती इथं आला की आईला बघू दे --

अक्षय : जमायचं नाही ! ठरलं ते ठरलं ! ( उठतो आणि डाव्या दारातून आत जातो. )

काकू : तो उठतो न् निघूनच जातो ! -- कुणी पटवून द्यावं म्हटलं तर थांबतच नाही तो इथं --

अवंती : मी बघते जरा बोलून -- ( तीही डाव्या दाराने आत जाते. )

समीर : बळवंतराव, याच्यात आता काहीतरी मार्ग काढा -- तिला पायांचं दुखणं आहे म्हणून प्रॉब्लेम आहे –- नाहीतर मी तिला आख्खी मिरवणूक दाखवून आणली असती -- या वयातली देवाबद्दलची इच्छा तरी मोडू नये असं मला वाटतं --

बळवंतराव: अहो, बरोबराय, पण मी कुठला मार्ग काढू ? कित्ती सांगून पाहिलं मी सुध्दा ! विचारा की काकूंना ! घरात गर्दी फार आहे म्हणून आपलं मी नुसता आलोय !

समीर : पण बघा, शेजारपणाचं दडपण वापरा जरा !

बळवंतराव: अहो, स्वत:च्या वयस्कर काकूचा तो मान ठेवेना -- आम्ही वाईटपणा घेऊन काय उपयोग ! -- शेवटी आम्हालाच शेजारी म्हणून राहयचंय ! पण हे असलं मलाही पटत नाही मात्र --

समीर : मग काय करताय बोला !

बळवंतराव: ( जणू घासाघीस चालल्याप्रमाणे--) साडेपंचवीस रुपये किलो देतो ! पटलं तर घ्या ! -- मी काय करणार हो -- माझ्या थोडंच हातात आहे -- ( अवंती येते.)

समीर : बरं ठीक आहे -- काही युक्ती सांगा -- मार्ग सांगा -- काय केलं म्हणजे हे जमून जाईल असं काही माहीत असलं तर ते सांगा --

बळवंतराव: याच्या साहेबानं सांगितलं तर होईल ! तिथं मऊ मांजर असतो म्हणे हा ! पण तो साहेब इथं कुठं भेटणार तुम्हाला --

समीर : ठीक आहे -- विचार तर करा -- अजून थोडा वेळ आहे -- फोन करता येईल का साहेबाला त्याच्या ?

बळवंतराव आयडिया आहे बाकी ! पण तोही गेलेला असायचा मिरवणूक बघायला !

समीर : ( अवंतीला -- ) वहिनी, कोण आहे त्याचा साहेब ? आहे का नंबर ?

अवंती : नंबर या घरच्या कॉमन डायरीतच आहे -- पारसनीस साहेब -- पण अक्षयला विचारायला नको ?

समीर : नुसती एक ट्रायल आहे -- बघू तर ! -- बघ वहिनी -- प्लीज -- ( अवंती नंबर काढून दाखवते. ) बघा बळवंतराव -- आहे का डायलटोन -- नाहीतर तीच बोंब असायची !

बळवंतराव: ( फोन पाहून -- ) आहे ! आहे !

समीर : (डायरी घेऊन उठत --) पाहू --! पाहू -- !( फोन घेतो. नंतर लावतो --) फोर फोर थ्री -- थ्री थ्री फोर झीरो। -- हां बरोबर -- फोर फोर थ्री थ्री थ्री फोर झीरो ! हां ! रिंग होतेय ! हां ! हॅलो ! पारसनीस साहेब आहेत का ?

फोनवर बाईचा आवाज : हो, आत्ताच आलो आम्ही मिरवणूक पाहून -- आता जरा झोप काढून पुन्हा जाणार -- तुम्ही कोण बोलताय ?

समीर : मी समीर शाळिग्राम बोलतोय, जरा प्लीज साहेबांना द्या ना !

तोच आवाज: एक मिनिट हं !

फोनवर पारस: हॅलो, हं, मी पारसनीस बोलतोय !

समीर : मी समीर शाळिग्राम बोलतोय साहेब ! अक्षय शाळिग्राम आहे ना तुमच्या ऑफीसात, त्याचा मी चुलत भाऊ ! काम असं होतं की मी जरा माझ्या आईला घेऊन आलोय सोलापूरहून -- त्याच्या गॅलरीतून मिरवणूक बघायला -- तो बघू देत नाहीय तिला -- जरा प्लीज सांगा ना अक्षयला --

फोनवर पारस.: का ? का बघू देत नाहीय ? द्या बरं त्याला --

समीर : ( आवाजहीन उडी मारत -- अवंतीला -- ) वहिनी -- एक मिनिट हं साहेब -- ( अवंती आत जाते.) मिरवणूक ही धार्मिकच नाही म्हणतोय तो साहेब -- येतोय हं तो -- एक मिनिट -- (काकू, बळवंतराव उत्सुक. ) तुम्हाला जरा त्रास देतोय साहेब पण तो तुमचं ऐकेल म्हणून -- ( अक्षय येतो. फोन घेतो. )

अक्षय : कोण पारसनीस साहेब का ?

फोनवर पारस.: हो --

अक्षय : मी अक्षय शाळिग्राम बोलतोय साहेब ! काही विशेष नाही साहेब -- या लोकांनी तुम्हाला निष्कारण --

फोनवर पारस. : का बघू देत नाही हो त्यांना ? अं ? बघू द्या की !

अक्षय : माझे विचार जरा वेगळे आहेत साहेब !

फोनवर पारस.: च्यायला, तुम्ही काय क्रांतिकारक वगैरे आहात का काय ! जपून राह्यला पाहिजे मग तुमच्यापासून ! ठीकाय ! बघूं द्या त्यांना ! अं ! गुडनाईट ! काय झालं ते मला सांगा उद्या ! अं ! गुडनाईट !

अक्षय : गुडनाईट साहेब ! ( फोन ठेवतो. ) वेडे का काय तुम्ही ? साहेबांना कशाला मधे घेतलं ? समीर, तुला काही समजतं का ? ते मला म्हणाले, जपून राह्यला पाहिजे मग तुमच्यापासून -- म्हणजे काय कळतं

का ? आता मलाच त्यांच्यापासून जपून राहावं लागणार ! ते क्रांतिकारक विचारांचा समजणार मला ! चालतो ऑफिसात असला माणूस ? तूही नोकरी करतोस ना ?

समीर : बरं जाऊं दे -- मी उद्या त्यांना पुन्हा फोन करीन -- पण आत्ता ऐक तरी त्यांचं --

अक्षय : वेडपट कुठले ! (प्रेक्षकांना -- ) अहो, ऑफिसातच काय, कुठंच चालत नाही असला माणूस -- घरात, नातेवाईकांत, शेजाऱ्यांत, मित्रांत -- कुठंही नाही चालत ! -- हे इथं नाटकात म्हणून चालवून पाहतोय झालं ! नाही तर माझाही पाडाव कधीच झाला असता ! ( आत जातो. )

अवंती : ( समीरला -- ) द्या इकडं ती डायरी ! काय उपयोग झाला ! ( डायरी ठेवून --) त्यांच्या नंबरमधेच शेवटी झीरो होता ! फक्त अक्षयबद्दल निष्कारण गैरसमज तेवढा पसरवला ! काही नुकसान झालं नाही म्हणजे मिळवलं !

काकू : म्हणजे काय करेल तो पारसनीस ? ( अवंतीही आत जाते. )

बळवंतराव: काही पण होऊ शकतं नं काकू ! आता एक तर यानं त्यांचं ऐकलेलं नाही -- आणि उद्या त्यांनी विचारल्यावर हा काही ऐकलं असं खोटं बोलणार नाही -- म्हणजे मग त्याला सगळं सांगावं लागणार -- चर्चा होणार -- याचे विचार असे जगावेगळे असल्याचं त्यांना कळणार !

काकू : मग काय होईल ?

बळवंतराव: चांगलं नसतं ते ! हाताखालच्या माणसाचे असे आपल्यापेक्षा वेगळे आणि शिवाय जगावेगळे विचार असणं कुठल्याही वरिष्ठाला आवडत नाही ! भाषणातसुध्दा हे लोक, मेणबत्तीसारखं स्वत: जळून दुसऱ्यांना प्रकाश द्या -- असं नेहमीचं सांगणारे असतात ! --

समीर : च्यायला, बिघडलंच सगळं !

बळवंतराव: तसं काही होत नाही म्हणा ! जाऊं द्या ! काही नाही होत !

समीर : बघा, दुसरा काही तरी विचार करा --

बळवंतराव: बघतो --

समीर : सांगू का काय काय बघितलं ते ?

काकू : अजिबात नको ! इथं प्रत्यक्ष काही दाखवता आला गणपती तर दाखव !

समीर : ( बळवंतरावांना -- ) हनुमान व्यायाम मंडळाची मुलं एका ठिकाणी लेझीम खेळतायत बघा ! अप्रतिम ! पिवळा गंजीफ्रॉक, निळी चड्डी ! अप्रतिम ! कसं काय नाचतात हो हे इतका वेळ !

बळवंतराव: एक तर देवाच्या भक्तीची शक्ती असतेच -- शिवाय थोडं टाकून येत असणारच ! नंतर दोन दिवस पडून असतात हे ! कामगारांची उपस्थिती विचारा की पुढं दोन दिवस !

काकू : मूळ मुद्दा सोडू नको -- त्याला पटवायचं बघ -- तो गणपती गेला इथून म्हणजे संपलं मग -- हे लेझीमचं आत्ता बोलत बसू नको --

अश्विनी : ( समीरला --) तू हेच बघ आधी -- आत जा -- आम्हाला माहीत नव्हतं म्हणावं -- आलो ती चूक झाली -- पण आता फार ताणू नका म्हणावं -- पुन्हा वर्षभर ही मिरवणूक होणार नाही -- आल्यासारखं बघू दे त्यांना --

समीर : मी ताणतच नाहीय म्हणतो तो -- आपणच ताणून धरतोय !

अश्विनी : अरे पण तुला पटतं ते तू बोलत राहा नं ! सगळीकडनं असं झाल्यावर विरघळतं एखादवेळेस माणूस !

बळवंतराव: आपण सगळेच आत गेलो तर ?

समीर : काय वेडपट प्रश्न विचारताय -- ( प्रेक्षकांकडे हात करून -- ) यांनी काय बघायचं मग !

बळवंतराव: हां -- ते आहे म्हणा !

समीर : त्याच्यावर दडपण आणलं पाहिजे एवढं खरं !

बळवंतराव: फक्त आता त्याच्यावर कशाचं दडपण येऊ शकेल हे सापडलं पाहिजे --

समीर : किंवा त्याच्याच तत्त्वज्ञानाला धरून असं काही बोलता येईल का की हे जमून जाईल ?

बळवंतराव: हां -- हे पण एक आहे -- पण सांगू का -- त्याच्या तत्त्वज्ञानाला धरून जरी आपण बोललो तरी त्याच तत्त्वज्ञानातनं तो त्याच्या विरुध्द काहीतरी बोलतो ! -- म्हणजे आपण आपलंच बोलल्यासारखं होतं !

समीर : जरा सोपं काही जमतंय का बघा । एवढं कॉम्प्लिकेटेड नको -- अनंतचतुर्दशीला इथं पुण्यात ही विसर्जनाची मिरवणूक नसतेच असं पटून जायचं आपल्याला -- म्हणून असले धोके नको --

बळवंतराव: आपण वेडे थोडेच आहोत ! --

समीर : (काही क्षणांनी -- ) का हो, उद्या दुकानं उघडतील ना -- पुण्यात आलो की इथल्या बाकरवड्या नेतोच मी --

बळवंतराव: कधी जायचंय तुम्हाला ?

समीर : इथं खाली रिक्शा मिळायला लागल्यावर -- हिला चालणं शक्यच नाही -- येताना फार त्रास झाला -- मधेमधे बसत बसत धरून कसंबसं आणलं --

काकू : जायचा विषय नकोय आत्ता -- मिरवणूक चाललीय ना अजून !

समीर : नाही, फक्त बाकरवड्यांसाठी विचारलं ! --

काकू : बाकरवड्या कुणाच्या घशात घालतोस मिरवणूक न बघता --

समीर : आम्ही बघतोय नं पण --

काकू : स्वार्थीपणाचं निदान बोलू तरी नको --

बळवंतराव: उद्या दुपारी चारपाच नंतर होईल बघा मोकळं --

काकू : मिरवणूक संपल्यानंतरचं कशाला बोलताय एवढ्यात ?

बळवंतराव: लगेच मागोमाग रस्ता झाडणाऱ्या बायका असतात -- गुलाल, फुलं, खच असतो नुसता !

काकू : नको म्हटलं ना --

बळवंतराव: हो, हो ! नाही !

काकू : हे जर जमलं नाही तर एका माणसानं तुम्हाला इतक्या सगळ्यांना हरवलं असं होणार आहे !

बळवंतराव: नाही, आम्हाला स्फूर्ती नका द्यू -- पण आम्ही प्रयत्न करणार आहोतच --

काकू : मीही आहेच म्हणा तुमच्याबरोबर !

बळवंतराव: उलट आम्ही तुमच्याबरोबर आहोत !

काकू : तेच ते ! ( अवंती येते. सगळे उत्सुकतेने पाहतात -- )

अवंती : सारखं आपलं तेच चालवत बसू नका म्हणतोय ! -- फार झालं म्हणतोय !

समीर : म्हणजे चोराच्या उलट्या झाल्या या -- !

बळवंतराव: पण तो त्या साईडनं बघतोय नं --

अवंती : दुसरं काही असलं तर बोला म्हणतोय -- एकच धरून बसू नका असं त्याचं म्हणणं -- बोलायला काही नसलं तर गाणी ऐका म्हणतोय टेपवर -- भीमसेन जोशी ऐका म्हणतोय -- वाटलं तर भक्तिगीतं ऐका म्हणतोय --

बळवंतराव: हे म्हणजे जखमेवर मीठ झालं -- हा मुद्दाम करतोय अशी मला शंका यायला लागलीय ! --

काकू: : मुद्दामच आहे हे ! प्रश्नच नाही !

अवंती : नवीन फ्लॅटमध्ये गेल्यावर लागेल तितके दिवस राह्यला या म्हणतोय --

काकू : कशाला ? नुसतं गावात मिरवणूक चाललीय एवढं ऐकायला ?
समीर : हे घर त्याचं आहे म्हणून तो पिळवणूक करतोय !
बळवंतराव: पिळवणूक काही नाही म्हणता येणार म्हणा ! कारण याच्यात त्याला काय मिळतंय ?
समीर : समाधान ! समाधान मिळत असेल आपल्या विरोधी विचारांना नामोहरम केल्याचं --
बळवंतराव: खरं म्हणजे मिरवणूक बघण्यात विचारबिचार काही नसतं -- बघायची -- एवढंच असतं --
समीर : पण याचे असले विचार असल्यानं आपल्याला विनाकारण विरुध्द विचारवाल्यांचं रूप येतं नं पण !
अवंती : उलट तोच म्हणतोय की तो कुणाच्या विरुध्द वागायचं म्हणून असं वागत नाहीय --
अश्विनी : मला तर अवघड दिसतंय हे !
समीर : ( चिडून -- ) मग आम्हाला काय वेगळं दिसतंय ?
अश्विनी : चिडतोस कशाला पण ? चिडून काय मार्ग निघणार आहे का ?
समीर : सगळं च्यायला ते पाहून आल्याचा आनंद घालवलात तुम्ही --
अश्विनी : आम्ही ?
काकू : मला म्हणतोय अगं तो ! स्पष्ट बोल म्हणावं -- असं आडून आडून नको --
समीर : जाऊं दे -- आनंद गेला हे तर खरं की नाही --
काकू : हो पण माझ्यावरच अन्याय होत असून मलाच बोलायचं हा कुठला न्याय !
बळवंतराव: मला एक नवीनच मार्ग सुचतोय !
समीर : सांगा नं मग लगेच !
बळवंतराव: हे काय होतंय की वादात तो जिंकतोय – सध्या आपल्या बाजूनं असा ताकदवान वाद घालणारा नाही ! त्यातही पुन्हा काय आहे की वादात जरी त्याला आपण कुणी समजा हरवलं तरी तो हटवादीपणा करणार ! -- म्हणजे त्याचाही उपयोग नाही --
अश्विनी : बरं मग ?
बळवंतराव: म्हणजे असं की वाचनाबिचनामुळं तो आपल्यापेक्षा हुशार होऊन बसलाय हे एक -- आणि त्याच्याही पुढचं हटवादीपणाचं हत्यार त्याच्याकडे आहे -- त्याचं मन वळवायचा प्रयत्न केला तर आपलंच मन वळायचा धोका आहे -
समीर : वेळ नका घालवू -- बोला पटकन् --
बळवंतराव: आपण त्याला शरण जाणं हा एकच मार्ग दिसतो मला -- त्याच्याकडून कुठलीही अपेक्षा न ठेवता नुसतं शरण जाणं !
समीर : मग काय उपयोग ! चागलं झालं म्हणेल तो ! आणि इतकं संपूर्ण शरण जायला देव आहे का तो ! ?
बळवंतराव: शरणागताला एक वेगळं महत्त्व असतं म्हणून म्हटलं मी !
समीर : त्याचा काही उपयोग नाही -- ( काही क्षणांनी -- ) आपणच उपाय काढायचे आणि आपणच कॅन्सल करायचे -- असं चाललंय आता -- त्याला काहीच करावं लागत नाहीय --
अश्विनी : दुसरं काही सुचतंय का ते तर बघू या --
बळवंतराव: ( अचानक उठत -- ) आयडिया ! आयला इतका वेळ कसं लक्षात आलं नाही ! आता मजा बघा ! आता बघाच तुम्ही ! दोन मिनिटांत आलो ! ( जातात. )
समीर : एवढा आनंद होण्यासारखी कुठली आयडिया निघू शकेल हे पटतच नाही मला --
काकू : सगळी अशी निराशा करू नको. बघ जरा.
अश्विनी : बघू या तर !

| | | |
|---|---|---|
| अवंती | : | बळवंतरावांच्या आयडियात बहुतेक वेळा काही दम नसतो. किरकोळ गोष्टींना प्रचंड महत्त्व देतात ते । |
| समीर | : | ( काकूंकडे पाहून, जरा चाचरत -- ) पण या वेळी सांगता येत नाही -- जमूनही जाईल ! |
| काकू | : | ( जोरात-- ) ' जमेलच ! ' -- असं म्हण ! |
| समीर | : | ( जरा घाबरून -- ) हो ! -- ( इथे साकेतच्या रडण्याचा आवाज येतो म्हणून अश्विनी आत जाते. काही क्षणांनी आवाज थांबतो. बळवंतराव येतात. बरोबर त्यांच्या चुलत भावाचे साडू श्री. घारपुरे येतात. ते सुमारे ४५ वयाचे असून अतिशय भडक रंगीबेरंगी कपड्यांत आहेत. अश्विनी बाहेर येते. ) |
| बळवंतराव: | | हे माझ्या चुलत भावाचे साडू श्री. घारपुरे -- हे पुणे को-ऑपरेटिव्ह बँकेत ऑफिसर आहेत. यांचाही खूप अभ्यास आहे. घरात हे मिरवणूक बघत बसले होते पण यांच्या अभ्यासाचा इथं उपयोग होईल हे आत्ता लक्षात आलं ! यांना मी थोडक्यात कल्पना दिली आहे. बोलतो म्हणतायत ते अक्षयशी ! |
| घारपुरे | : | हां, कोण -- अक्षय कोण --? ( जरा अति-आत्मविश्वास. ) |
| बळवंतराव: | | बोलवा त्याला -- अब आयेगा मजा -- ( अवंती आत जाते. ) काय आहे, विचाराला विचारानंच काटलं पाहिजे -- दुसरं कुठलं औषध चालत नाही तिथं -- |
| समीर | : | ( बळवंतरावांना -- ) जरा विव्दान आहेत का पण ? |
| बळवंतराव: | | बघाच नं तुम्ही आता ! ( अवंती आणि अक्षय येतात. ) -- हं -- हा अक्षय ! -- आणि अक्षय, हे माझ्या चुलत भावाचे साडू श्री. घारपुरे. तुझ्याशी बोलायला आलेयत ! बोल त्यांच्याशी ! |
| अक्षय | : | नमस्कार ! काय, कशाबद्दल -- यांची ओळख झाली होती मागे एकदा -- |
| घारपुरे | : | हो, हो ! तर अक्षय, मी काय म्हणतो, मी तुमच्या विचारांचं स्वागत करतो. मानवाची प्रगती नव्या विचारांशिवाय होणारच नाही. पण नुसतं जुनं किंवा नुसतं नवं कसं चालेल ? दोन्हींतलं जे चांगलं चांगलं असेल ते घ्यायला नको का ? परंपरा आणि नवता दोन्ही तुल्यबळ असल्याशिवाय बॅलन्सशीट टॅली कसा होईल ? |
| अक्षय | : | तुम्हाला ओळखता येतं का -- दोन्हीतलं चांगलं चांगलं काय आहे ते ? |
| घारपुरे | : | अहो तसं नसतं ते -- माणसं ठरवत जातात आणि त्यातून ठरत जातं ते -- |
| अक्षय | : | ही तुमची जी पध्दत आहे नं ती बॅलन्सशीट बाहेरनं टॅली करायची पध्दत आहे -- मी तो जरा आतनं टॅली करायच्या प्रयत्नात आहे -- |
| घारपुरे | : | म्हणजे कसं ? |
| अक्षय | : | दोन्हीतलं चांगलं चांगलं घ्यायच्या ऐवजी मी दोन्हीतलं वाईट वाईट टाकावं म्हणतोय. |
| घारपुरे | : | व्हेरी गुड -- तरी चालेल -- एकच ते -- |
| अक्षय | : | पण मग दोन्हीकडं शून्य उरून टॅली होतोय बॅलन्सशीट -- सार्त्र ज्याला नथिंगनेस म्हणाले त्यालाच त्यांचे वडील संत तुकाराम ' नाही ऐसा मनी अनुभव ' म्हणत होते. किंवा ' अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ।। ' म्हणजे काय ' तुका ' थुंकावा म्हणजे जमा केलेलं सगळं टाकून द्यावं -- धर्म म्हणजे बाहेरून काही घ्यायची गोष्ट नाहीच आहे -- तुकाराम महाराज म्हणतात की ' मागेपुढे अवघा दिसे रिता ठाव ' किंवा ' तुका म्हणे कांहीं उरो नेदी उरीं ! ' |
| घारपुरे | : | बरं, मला एक सांगा, मूर्तीपूजा मानता की नाही ? |
| अक्षय | : | समजा मानतो. पण गणेश चतुर्थीला -- घरातला गणपतीचा फोटो, मग घरातला बसवलेला गणपती, मग घराजवळचं गणपतीचं देऊळ, मग दशभुजा गणपती, त्यानंतर सारसबागेतला गणपती आणि मग बाबूशेट सोनारचा गणपती -- अशी दर्शनं घेत फिरणं याला मी खुळचट हावरटपणा म्हणतो. एवढं |

करूनही पुन्हा अष्टविनायक वेगळेच राहतात. तुम्ही हे सगळे वेगवेगळे समजताय याचा अर्थच तुम्ही छोटेछोटे देव मानताय -- अमर्याद देवाचं ध्यान करायची तुमची इच्छा नाही --

घारपुरे : काही मूर्ती स्वयंभू असतात !

अक्षय : मूर्ती मानवनिर्मित का स्वयंभू याला महत्त्व नाही -- मानतो माणूसच ! देव मानवनिर्मित कसा असेल ?

घारपुरे : बरं जागृत देवस्थान तरी ?

अक्षय : देवस्थान निद्रिस्त किंवा जागृत नसतं. प्रश्न आपण निद्रिस्त असण्याचा असतो. आपल्याला जागृत व्हायचं नसल्यामुळं आपण एखाद्या देवस्थानाला जागृत म्हणतो ! धर्माच्या दलालांनी पसरवलेल्या अफवा असतात त्या ! जागृत आणि स्वयंभू याबद्दल कुठल्या संतानं कुठं काही म्हटलेलं सापडतंय का बघा !

घारपुरे : त्या त्या ठिकाणचं स्थान-माहात्म्य असतंच ना।

अक्षय : ’ तुका म्हणे आम्हा ब्रम्हांड पंढरी ’ -- याला म्हणतात स्थानमाहात्म्य ! स्थानमाहात्म्य जरी मानलं तरी ते अमर्याद -- वैश्विक असतं ! तुम्हाला एक स्थानमाहात्म्य पुरत नाही ! प्रत्येक ठिकाणचं स्थानमाहात्म्य ओरपत तुम्ही नुसते ट्रिपा मारत फिरत असता ! ’ देव आहे अंतर्यामी । व्यर्थ हिंडे तीर्थग्रामी ।। ’ -- याचा अर्थ समजून घ्या --

घारपुरे : पुण्यसाठा तर वाढत जातो --

अक्षय : तुकाराम म्हणतात, ’ मुख्य धर्म देव चित्तीं ’ आणि ’ देव अंतरे ते पाप ’ -- तसंच ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात खुद्द भगवान म्हणतात की ’ माझी प्राप्ती ज्या पुण्याईने दुरावते, त्याला पुण्य असे म्हणतांना, म्हणणाऱ्याची जीभ झडणार नाही काय ? ’

घारपुरे : तुम्ही एकदम कडक उदाहरणं देताय -- बोलणं ठीक आहे -- हे प्रत्यक्ष कळायला जन्मोजन्मीची तपश्चर्या लागते ! सहज, सोपं नाही ते !

अक्षय : संत तर हे सहज सोपं आहे असं म्हणतात -- आणि त्यांना खोटं बोलायचं काही कारण दिसत नाही -- बरं ते सगळ्यांना उद्देशून बोलतायत --’ देवाचिये व्दारी उभा क्षणभरी ’ -- हे सगळ्यांना सांगायचं कारण काय मग ? मिळालेला नरजन्म वाया दवडू नका हे सगळ्यांना का सांगतात ते ? आपल्यालाच टाळाटाळी करायची असते ! आपणच आपली दु:खं सोडायला तयार नसतो ! नीट बघा हे !

घारपुरे : म्हणजे तुम्ही काहीच मानायला तयार नाही !

अक्षय : मी की तुम्ही ? मी उलट संतांचं सांगतोय ।

घारपुरे : ते टीव्हीवरच्या महाभारतातले बाण कसे टक्कर झाल्यावर सगळेच कौरवांकडे जायचे तसा प्रयत्न करताय तुम्ही ! आमच्याच संतांची उदाहरणं आमच्यावरच उलटवताय तुम्ही !

अक्षय : ’ आमचा शेतकरी ’, ’ आमचा मराठी माणूस ’, ’ आमचा सामान्य नागरिक ’ -- असलं बोलायला हे काही राजकारण नाही ! धर्माचं बोलतोय आपण !

घारपुरे : पण ते महाभारत ऑथेंटिक नव्हतं एवढं लक्षात ठेवा -- खरं महाभारत वेगळंच आहे -- चोप्रांना ते जमलं नाही --

अक्षय : मुळात, खरं महाभारत माहीत नसलं तरी काही बिघडत नाही -- पण तुम्हाला आहे का माहीत ? खरं महाभारत ?

घारपुरे : मान्यवर विव्दानांचं मत सांगतोय मी !

अक्षय : तर परंपरा आणि नवता या दोन्हीतलं वाईट वाईट टाकलं की उत्तर दोन्ही बाजूंना शून्य येतं ! -- हे समजून घ्या !

घारपुरे : अहो, मानवजात अशी चालत नसते -- थोडी थोडी बदलत चालत असते --

अक्षय : त्यालाच परंपरा म्हणतात --

घारपुरे : डोंट कॉम्प्लिकेट द थिंग्ज -- बी सिंपल --

अक्षय : मग तुम्ही सांगा नं नवता म्हणजे काय ते --

घारपुरे : तुम्ही वितंडवाद घालू नका हो -- स्टिक टू लॉजिक --

अक्षय : उलट धर्माच्या बाबतीत लॉजिक म्हणजेच वितंडवाद असतो -- मानवी बुध्दीच्या आवाक्यात धर्म येऊ शकत नाही -- हेही म्हणतात संत !

घारपुरे : नाही, मग मी सांगू का, तुमच्या बोलण्याला काही बेसच नाही आहे -- त्यामुळं कम्युनिकेशनच अवघड होतंय --

अक्षय : मग बंद करू या चर्चा !

घारपुरे : ठीक आहे. या काकूंना मिरवणूक बघू द्या -- परंपरेचाही मान ठेवा -- एवढंच सांगायला आलोय --

अक्षय : आपलं चर्चा थांबवायचं ठरलं, तर पुन्हा परंपरेचं काय बोलताय ?

घारपुरे : बरं त्याला तुम्ही काहीही म्हणा ! लॉजिकच सोडल्यावर तुम्हाला पटवणंही अशक्य आहे ! पण तुकारामसुध्दा ' नाचू कीर्तनाचे रंगी ' म्हणालेच ना ? यांनाही होऊ द्या ना दंग !

अक्षय : तुकारामांचे बरेच महत्त्वाचे अभंग लोकांना माहीतच नसतात -- नुसते रेडिओवर लागणारे किंवा कॅसेटमध्ये असलेले तेवढेच माहीत असतात – आणि माझ्या माहितीप्रमाणे ' नाचू कीर्तनाचे रंगी ' हे संत नामदेवांचे आहे --

घारपुरे : नुसतं माहीत असून करायचंय काय ? समजलं पाहिजे --

अक्षय : मी तेच म्हणतोय ! मलाही समजत नाही -- मी स्वत:ला फक्त एक छोटासा ' भारवाही ' समजतो !

घारपुरे : बाकीचं जाऊं द्या आता -- परंपरा आणि नवता यांच्या सहअस्तित्वाचा नियम मान्य करा -- बास --

अक्षय : मी अस्तित्वाचा नियम कळू शकेल का या उत्सुकतेत आहे – सहअस्तित्वाचं फार झालं ! अच्छा ! ( आत जातो. )

घारपुरे : बळवंतराव, गॉन केस आहे -- अशक्य आहे -- चला ! खरं तर असल्या माणसांशी मी बोलतच नाही – एक तुम्ही म्हणालात म्हणून, मिरवणूक बघायची सोडून आलो ! जाऊं द्या ! चला ! तुम्ही थांबताय का -- मी चलतो मग ! काय लोक असतात एकेक ! ( जातात.)

बळवंतराव: आयला, एवढा हुशार माणूस पण फेल गेला ! म्हणजे अक्षय काय एवढा जास्त हुशार असेल का काय !

अश्विनी : सोप्पं बघा काहीतरी --

समीर : माझं तर डोकंच चालत नाही --

बळवंतराव: काढू काहीतरी मार्ग --

अवंती : बघा, काही सापडलं तर -

काकू : ( ओरडतात -- ) गप्प बसा ! काही नकोय मला ! काही व्हायचं नाही तुमच्या हातून -- ( सगळे जरा चकितपणे पाहतात. हा आवाज ऐकून अक्षय येतो. तो वाचत असलेलं पुस्तक त्याच्या हातात आहे. )

अक्षय : काय झालं ?

बळवंतराव: इकडं ये -- बस इथं -- तुझ्यामुळंच आहे हे सगळं -- नाहीतर सरळ साधं आहे -- सगळं --

अक्षय : काय ? आता ते मिरवणुकीचं सोडून बोला --

बळवंतराव: बरं ये, चल -- मिरवणुकीचं सोडूनच बोलतो --

अक्षय : बोला नं मग --

बळवंतराव: आता एक बघ -- जगात पुष्कळ माणसं आहेत -- अं ?

अक्षय : मला कशाला ' अं ' करताय ? आहेतच --

बळवंतराव: मी प्रश्न विचारला तरी मधे बोलू नकोस -- तर या सगळ्या माणसांमधे निरनिराळे मतभेद आहेत— अं ? --

अक्षय : तुम्ही ' अं ? ' असं म्हणू नका -- पुढं बोला --

बळवंतराव: तर हे निरनिराळे मतभेद असलेली जी माणसं आहेत त्यांच्यापेक्षा तुला काही वेगळं कळलेलं आहे का ? हो किंवा नाही एवढंच उत्तर दे -- ( विजयी मुद्रेनं समीरकडे पाहतात. समीर त्यांच्याकडे पाहून पुन्हा अक्षयकडे पाहतो.)

अश्विनी : या प्रश्नानं काय होणार ?

बळवंतराव: थांब तू -- बघच -- ( अक्षयला --) हं बोल --

अक्षय : ज्या गोष्टी मला संशयास्पद वाटतात किंवा ज्यात काही तथ्य नाही असं लक्षात येतं ते मी आहे तसं चालू ठेवत नाही -- धर्म ही अशी बाहेरनं मिळवण्याची गोष्ट नसावी -- हे नक्की ! ( जायला लागतो -- )

बळवंतराव: एवढी रात्र झालीय -- कशाला वाचतोयस असली समाजविघातक पुस्तकं ?

अक्षय : खरं शोधणारा घातक नसतो -- खोटं टिकवणारा घातक असतो -- ( जातो. सगळे अवाक. काही क्षणांनंतर काकू तिथेच लवंडतात. )

समीर : आई, झोपू नको -- न जाणो अक्षय कधीही तयार होईल -- पाझर फुटणारच नाही त्याला असं काही मला वाटत नाही --

काकू : ( चिडून -- ) झोपत नाहीय मी ! -- पडलेय नुसती --
( अवंती उठते, जाऊन काकूंजवळ बसते. )

अवंती : ( काकूंना -- ) पाय देऊ का जरा दाबून हलक्या हातानं ?

काकू : नुसतं तळव्यांना तेल लाव जरा --

अवंती : हं -- ( उजव्या हाताला जाते. )

समीर : आता जरा जवळ आला असेल तो गणपती -- हळू चालते फार पण मिरवणूक -- एका दृष्टीनं बरंच आहे म्हणा ते -- तेवढा वेळ तरी मिळेल --

बळवंतराव: मिरवणूक वेळेत संपायला पाहिजे ही उलट काळजी असते सगळ्यांना -- आपलं वेगळं आहे म्हणा --

समीर : चल, आपण जरा पाहून येऊ -- साधारण किती अंतरावर आलाय हे लक्ष पाहिजे आपलं -- त्याप्रमाणे प्रयत्नांचा वेग वाढवावा लागेल --

अश्विनी : हं चल -- ( ती उठते. अवंती तेलाची वाटी घेऊन येते. तिला -- ) आम्ही येतो जरा जाऊन --

अवंती : हं -- ( ती दोघं दार उघडून जातात. अवंती तेलाची वाटी ठेवून दार लावून येते. बळवंतराव चटईवर पडतात. अवंती काकूंच्या पायांच्या तळव्यांना तेल लावू लागते -- )

काकू : नव्या फ्लॅटमधे जाण्याचा आणि मूल होऊ देण्याचा काय संबंध ? ते काय म्हणत होतीस ते --

अवंती : अप्पांचा काही प्रश्न नाही पण आई फार संतापी झाल्यायत हल्ली -- बारीकबारीक कारणावरनंही चिडतात -- कुठलंही काम म्हटलं की टेन्शनच येतं त्यांना -- पुणं मध्यवर्ती आणि त्यात आमचं घर आणखी मध्यवर्ती -- त्यामुळं पाहुणेरावळेही असतात सारखे मधनंमधनं -- त्यानंही त्या वैतागतात --

काकू : मोलानं करून घ्यावी कामं -- तुम्हाला काय कमी आहे ?

अवंती : एक तर चांगल्या, विश्वासू मोलकरणी मिळत नाहीत आणि मिळाल्या तर पैसे भरपूर घेऊनही काम

डफरावू करतात -- रजा फार घेतात -- त्यानंही त्या संतापतात -- काहीच सहन होत नाही त्यांना -- म्हणून अक्षयचं म्हणणं, मूल झालं की आणखी कामं वाढणार आणि प्रश्नच होईल तो -- आम्ही दोघंही नोकरीला जाणार -- मूल झालं की नोकरी सोडून दे असं म्हणत होत्या त्या मला -- म्हणून अक्षयचं म्हणणं, फ्लॅटमध्ये गेल्यावर आपलं आपण हँडल करू --

काकू : मुलाचं काय करणार त्या वेळी ?

अवंती : पाळणाघरात ठेवता येईल --

काकू : हं -- मग बरोबर आहे -- ( काही क्षणांनी -- ) पण तुम्ही असं फ्लॅटमधे जाणं पसंत आहे का त्यांना ? बरं दिसेल का ते ? ( तेल लावण्याबद्दल -- ) -- बास ! --

अवंती : फ्लॅट घ्यायचा ठरलंय नं सगळ्यांच्या विचारानं -- आता कसं दिसेल ते द्यायचं सोडून -- हा वाडा पाडून इथंही पुढंमागं फ्लॅट होण्याची शक्यता आहे म्हणतात -- ( तेल लावणं थांबवते. )

काकू : हं -- आमची अश्विनी एक तुझ्यासारखीच चांगली मिळाली बघ सून -- स्वभावानंसुध्दा चांगली आहे – थोरल्याची खाष्ट आहे -- सारखं आपलं तेच खरं करत बसते -- ( जरा वेळानं -- ) गेले कुठं हे ? का बघत बसले गणपती ? मला अशी तळमळत ठेवून ?

अवंती : येतील --

काकू : ( काही क्षणांनी -- ) बळवंतरावांकडे कोणकोण असतं घरी ? ( बळवंतराव उठून काकूंजवळ जाऊन बसतात. )

बळवंतराव: ( बसत -- ) घर कसलं, धर्मशाळा आहे आमची ! हिला आहे मोठेपणाची हौस -- बोलवून बोलवून माणसं जमा करते -- एवढं केलंच पाहिजे म्हणते -- घरात वैताग होतो सगळा -- पण काय करणार ? सामील व्हावं लागतं -- लोकांना दाखवता येत नाही -- आम्हालाही मोठेपणा मिळतो -- अहो, गोंदवलेकर महाराज म्हणतात -- घर आल्यागेल्याचं असावं -- त्याचा अर्थ हा नव्हे -- खर्चसुध्दा किती होतो । --

काकू : संसार आहे हा बळवंतराव -- ( डोअरबेल वाजते. )

बळवंतराव: थांबा, मी बघतो -- ( जाऊन दार उघडतात. समीर, अश्विनी येतात. ते दार लावून आपल्या चटईकडे जाऊन बसतात.)

समीर : ( काकू एकटक पाहताहेत हे पाहून --) जवळ आलाय -- आता एक तासाभराच्या आत इथं असेल तो -- समोर --

काकू : दारं उघडायला लाव त्याला -- तेवढा तो तरी पाहू दे म्हणावं -- जोरानं बोल जरा -- गुळमुळीतपणा नको नुसता --

समीर : हो -- तेच बघतो नं आता --

अश्विनी : ( फक्त जवळचं ऐकू जाईल असं -- ) काय बघणार तू ?

काकू : काय म्हणाली ती ?

समीर : काहीतरी कर म्हणाली --

काकू : ( उठत --) हं -- येते जाऊन जरा हळूहळू -- ( मोरीच्या दिशेने जातात. बाकीचे बसलेले, बळवंतराव चटईवर पडलेले. )

अवंती : ( अश्विनीला -- ) थोड्या वेळापूर्वी तुझ्याबद्दल चांगलं बोलल्या !

अश्विनी : बोलल्या असतील ! -- तसं पाहिलं तर गणपतीबद्दलच्या आपल्या भावनांप्रमाणे बघितलं तर -- बाकी

काहीही असो -- यांना मिरवणूक पाह्यला मिळावी असंच मला वाटतं -- पण दुसऱ्या पध्दतीनं पाहिलं तर आम्हाला पडेलपणानं वागायची सवय यांनीच लावलीय -- मनाविरुध्द काही झालं की तमाशा करायचा, दंगा करायचा -- असं या करतात -- त्याला आम्ही घाबरतो -- त्यामुळं आम्ही झालोय गुळमुळीत -- आणि आता, त्यांच्यासाठी -- त्यांना मिरवणूक बघता येण्यासाठी -- आम्ही जोरात, आक्रमक वागावं असं त्यांना वाटतंय ! -- पण आम्हालाही अचानक अशी मनाला उभारी देता यायला पाहिजे ना ! -- त्यामुळं जमेल तेवढं ठीक आहे ! त्यांच्या अपेक्षा बदलल्या म्हणून आम्हाला एकदम या टोकावरून त्या टोकावर कसं जाता येईल ? त्यामुळं आता, खरं तर त्यांच्या मनाप्रमाणे नाही झालं तरी ते योग्यच आहे असं मला वाटतं ! शिवाय आपल्याही मनात थोडा राग असतोच ! पण त्यांच्या मनासारखं झालं नाही तर परिणाम शेवटी एकदम भयानक होऊ शकतो -- त्याला घाबरून, पुन्हा, होऊं दे एकदा त्यांच्या मनासारखं असंही वाटतं -- !! -- मनात हे असलं सगळं तरी वरवर जरा चांगलं वागायचं एवढंच ! आणि असं वागण्यानंही समजा त्यांच्या मनासारखं झालं तरी चांगलंच आहे ! आपला पुढचा त्रास वाचला ! त्यामुळं आम्ही बाहेर जातो तेव्हा, या बाबतीत आमचं बोलणं होतं तेव्हाही मी काहीच ठामपणानं बोलत नाही. कारण काहीही घडलं तरी आतल्याआत मला बरंच वाटणार आहे. फक्त मी या सगळ्या प्रकारात वाईट ठरू नये एवढीच आपलं मला थोडीथोडी काळजी घ्यायचीय एवढंच ! आणि आत्ता तरी त्यांना थोडा त्रास होतोय -- फारसा आपल्याला त्रास न होता -- हे खरं तर मनातनं बरंच वाटतंय मला -- इथं आल्यावर असंही थोडं सुख मिळेल याची कल्पना नव्हती -- ( काकू हळूहळू येतात. )

अवंती : आल्या बरं का --

अश्विनी : ( काकू जवळ येऊन बसतायत हे जाणवत --) तर दुपारच्या वेळी आई सगळ्या मराठी सीरीयल्स बघतात -- बघता बघता भाजी निवडणं, चिरणं वगैरे असं सगळं त्या करतात -- मला खूप मदत असते त्यांची ! --

काकू : हिला जाणीव आहे तशी त्या थोरलीला नाही -- हिचा स्वभाव चांगला आहे -- काय बोलत होता एवढा वेळ ?

समीर : सगळं काही सारखं तुझ्याबद्दलच बोलणं चाललेलं असतं काय ? --

काकू : तेच -- दुसरं काय होतं ?-- मला आपली उत्सुकता वाटते म्हणून मी विचारते बापडी -- सांगायचं नसेल तर नका सांगू --

समीर : दुसरे काय उपाय करता येतील तेच विचार करत होतो --

काकू : विचार नको नुसता -- काय जेवताबिवता की नाही -- जोर लावा जरा --( अवंती आणि अश्विनी एकमेकींकडे पाहतात. )

समीर: : हो --

काकू : ( काही क्षणांनी -- ) त्याला इथं येऊन बस म्हणावं -- आता तोच एक विषय पायजे --

अवंती : ( उठत -- ) मी आणते बोलावून -- ( डावीकडे जाते. )

काकू : ( समीरला -- ) सगळं कौशल्य पणाला लाव तुझं -- हात हलवत परत येऊ नकोस -- बळवंतरावांना उठून बसा म्हणावं --

बळवंतराव: ( उठून बसत -- ) आहे, तसा जागाच आहे मी !

काकू : नुसतं ते नाही -- पाठिंबा द्या जरा --

बळवंतराव: तुम्ही खात्री बाळगा काकू -- ( अवंती येते. काकू बघतात. मागोमाग अक्षय येतो. दिवाणावर बसतो.)

अक्षय : हं -- बोला --

काकू : ' हं बोला ' काय -- इथं काय घर विकायचा व्यवहार चाललाय का ?

समीर : मी काय म्हणतो अक्षय, तुझं हे वाचन आणि विचार आणि ती व्याख्यानं ऐकणं यांच्यामुळं तुझा स्वभाव बदललाय असं नाही तुला वाटत ? पूर्वी इतका असा नव्हतास तू --

अक्षय : लहानपणी मी सायकलवरनं सिंहगडला जायचो --

समीर : ते नाही --

अक्षय : स्वभावाचा काही प्रश्न नाहीय त्याच्यात -- आणि समज स्वभावाचंच आहे -- तू पुण्यात आल्यावर सोमण उपाहारगृहातले बटाटेवडे खाणं आणि आपट्यांच्या बाकरवड्या घेणं हे कधी चुकतं का ? बाकरवड्या नाही मिळाल्या तर कासावीस होतोस की नाही ? हे कासावीस होणं सगळीकडेच चालतं मग !

समीर : त्याचा न् याचा काय संबंध ? आणि माझ्या या स्वभावाचा दुसऱ्यांना काय त्रास आहे ?

अक्षय : स्वभाव वेगवेगळे असतात सगळ्यांचे हे कळलं ना की मग त्याचा त्रास करून घ्यायचा नाही हेही कळावं लागतं --

काकू : ( ओरडतात --) संबंध बिघडतील आपले -- हं -- ( सगळे काही क्षण अवाक. )

समीर : ( हळू आवाजात -- ) भडकू आहे ती जरा -- मनावर घेऊ नकोस -- पण प्रॉब्लेम होईल -- ऐक जरा --

काकू : काय बोलतोय हळूहळू ? मला ऐकू येऊ दे --

समीर : ( वैतागून -- ) तुझ्याच कामाचं बघतोय -- सगळं मोठ्यांदा बोललं तर तुझंच काम होणार नाही -- मला दोष देऊ नकोस मग --

अश्विनी : जाऊं द्या -- भाऊजी -- तेवढा एक तरी गणपती बघू द्या त्यांना --

अक्षय : ( समीरला -- ) तुम्हाला मिरवणूक बघणं जेवढं साधं वाटतं तसंच ती न बघणं हे साधं असल्याचं माझ्या लक्षातच येत असेल तर ? गर्दीचा आधार न घेता बोल ! ती दुसरीकडेही पुष्कळ ठिकाणी असते --

समीर : तुला सांगू का, स्वभाव असतो, तो नसतो असं मी म्हणत नाही -- पण लाईफ चालतं कशावर -- तर स्वभावाला मुरड घालण्यावर --

अक्षय : कसं काय ?

समीर : म्हणजे आख्खी मिरवणूक तुझ्या म्हणण्याप्रमाणे वाया गेली की नाही -- मग आता तिच्या इच्छेखातर तेवढा एक तरी बघू द्यायचा --

अक्षय : माझ्या स्वाभावाला मुरड घालण्याचा आणि हा गणपती दिमाखात मिरवणुकीत येण्याचा काही संबंध आहे हे लक्षातसुध्दा येणार नाही कुणाच्या -- फार ताणलेलं वाटतं हे --

समीर : पण खरं आहे की नाही ?

अवंती : जाऊं दे -- ऐक ना तेवढं --

अक्षय : तू मधे बोलू नकोस -- सगळा विचार करून आपणच हे सगळं ठरवलंय --

अवंती : पण वेळकाळ पाहून बदल करावा लागतो --

अक्षय : ( समीरला --) हा विषय सोडून काय असलं तर बोल -- तेच तेच नको सारखं --

काकू : तेच फक्त आहे आणि तेच तेच नको काय !

समीर : माझं ऐक तू --

अश्विनी : विचार करा भाऊजी --

समीर : आता मी तुला एक खरं ते सांगतो -- आईला एकदा हार्टअॅटॅक येऊन गेला आहे हे तुला माहितीच आहे -- आणि ती आहे संतापी --

काकू : मला काही ऐकू येत नाहीय -- पण माझ्याबद्दल वाईट सांगून माझं काम करून नकोय मला --

समीर : ( काकूंकडे पाहात-- ) उलट तुझं मन दुखावलं तर आम्हाला कसं दु:ख होतं ते सांगत होतो --

अक्षय : किती खर्च आला त्या वेळी ?

समीर : ते जाऊं दे --

अक्षय : थोरल्या बंधूराजांनी काही दिले की नाही ?

समीर : अर्धे दिले पण ' तिला आता जास्त संतापू देऊन उपयोगी नाही ' -- हे सांगून दिले !

अक्षय : त्याच्याकडे का नाही राहात ही काही दिवस ?

समीर : तिचं आमच्यावरच जास्त प्रेम आहे -- तिकडं तिला आवडत नाही --

अक्षय : हं --

समीर : तिला फार संतापू दिलं तर टोला बसेल मला मोठा -- अर्धा खर्च म्हटलं तरी भरपूर होतो -- शिवाय बरंवाईट व्हायचा धोका --

अक्षय : प्रॉब्लेमच आहे मग --

समीर : तर !

अक्षय : आपण आता जास्त संतापता कामा नये हे तिचं तिला नाही का कळत ?

समीर : कळतं -- थोडा फरकही पडलाय त्या फटक्यानंतर -- पण स्वभावच तो -- ती तरी किती आवरू शकणाराय --

अक्षय : च्यायला -- धोक्याचं आहे मग --

समीर : म्हणून म्हणतोय -- आता जास्त ताणू नकोस -- तुझं सगळं बरोबर आहे -- हेसुध्दा कबूल करतो मी – पाहिजे तर आम्ही दोघांनी आयुष्यभर पुन्हा मिरवणूक पाह्यची नाही अशी कंडिशन घाल -- पण तिला पाहू दे तेवढं --

अक्षय : फार लाचारी होतेय पण ही --

समीर : काय करणार -- पुढच्या प्रसंगांना घाबरतो मी -- सगळे प्रश्न आर्थिक कुवतीवर केंद्रित आहेत बघ --

अक्षय : ती सुधारली की सगळ्यांचे स्वभाव एकच होतील !

समीर : तसं नाही रे --

अक्षय : मी काय म्हणतो, आयुष्यात वेगवेगळे प्रसंग येतात -- त्यांना काही आपण नको म्हणू शकतो का ? आपलं आपण सावरून घेतो की नाही त्यावेळी ? -- तसं मी तुमच्या आयुष्यात आलेला एक प्रसंग आहे असं का नाही समजत तुम्ही ?

समीर : तू समजून घेणारा आहेस म्हणून सांगतो रे -- तिरसट असतास तर सांगायचा प्रश्नच नव्हता -- अर्थात मग तू ही मिरवणूक बंदीही केली नसतीस म्हणा – बहुतेक -- काय बोललो मी कुणाला ठाऊक -- जाऊं दे। --

बळवंतराव: अक्षय, मला याचं पटतंय --

काकू : इतका वेळ माझ्याबद्दल चांगलं बोलण्यासारखं काय आहे ? मागनं ते मिरवणुकीचं नुसतं थोडं थोडं ऐकू येतंय सारखं --

समीर : ( मोठ्या आवाजात --) बरं मोठ्ठ्या आवाजात बोलतो -- काहीही म्हटलं तरी तो ऐकायला तयार नाही ! -- आलं ऐकू ?

अश्विनी : ए, असं कशाला एकदम --

अवंती : असं काही नाही काकू, बोलणी चाललीयत अजून --

बळवंतराव: काकू, तुम्ही शांत राहा बरं जरा -- इतके सगळेजण तुमच्यासाठीच झटतायत नं -- तुम्ही असं सारखं विक्षेप आणत बसला आणि समीर चिडून चर्चेतनं बाहेर पडला तर काय करणार ?

काकू : तसं नाही करणार तो ! चांगला आहे माझा बाळ तो !

अश्विनी : यशस्वी झाल्यावर मग चांगलं म्हणा ! आधीच नका म्हणू !

बळवंतराव: ( समीरला -- ) जरा जाऊन येऊ का घरी ? काय कमीजास्त बघून येतो --

अवंती : मी कॉफी करू का एकदा सगळ्यांना ?

बळवंतराव: ( सूचकपणे -- ) हां ! बघा कॉफी करत असलात तर ! अं ?

अश्विनी : ( ते गोळीचं लक्षात आल्यानं -- ) नको -- नको !

बळवंतराव: ठीक आहे, राहू द्या मग, करा कॉफी, आलोच !--

काकू : बळवंतराव, तुम्ही कुठं जाताय -- बसा इथं -- हे इथलं अर्धवट सोडून जाऊ नका --

बळवंतराव: नाही, येतच होतो लगेच परत --

काकू : काही नको -- बसा ! काही जायचं नाही ! ( बळवंतराव नाईलाजाने बसतात. )

बळवंतराव: ( पुटपुटत --) माझं डोकंही चालत नाहीय आणि बसून करायचं काय -- असं होतंय हो -- ( याकडे कुणी लक्ष देत नाही -- ) -- ठीक आहे -- ( बसतात. )

काकू : माझं जीवन सगळं हालअपेष्टांत गेलेलं आहे हे लक्षात ठेवा -- पोरं लहान असताना हे वारले -- पोरांना मोठं करणं, शिकवणं, त्यांच्या नोकऱ्या, लग्नं ही सगळी काही खाऊची गोष्ट नाही -- माझ्या भावाची मदत घेऊन केलंय मी सगळं -- किती त्रास झाला असेल -- कशा परिस्थितीतून जावं लागलं असेल -- विचार करा जरा -- मला या वयात आता तत्त्वज्ञान सांगत बसू नका -- इतकं दु:ख सहन करणं -- अपमान सहन करणं -- मधनंमधनं मुलांची आजारपणं काढणं -- यांनी कशी मन:स्थिती होईल माणसाची -- जरा विचार करा -- कुण्णाचा उपयोग नसतो अशा वेळी -- मुलं मोठी झाल्यावर, त्यांना नोकऱ्याबिकऱ्या लागल्यावर पुन्हा सगळे जवळ करतात -- अडचणीच्या वेळी लांबच राहतात सगळे -- इतकं सगळं मनाविरुध्द सहन करत आलेय मी -- आता मला त्रास देऊ नका -- मीसुध्दा संतांचं वाचलंय -- नामस्मरणसुध्दा करते -- पण ते वेगळे, आपण वेगळे, आपण काही संत नाही -- आपण फक्त सामान्य माणसं ! -- कळलं ?

समीर : खरं आहे पण हे !

अवंती : ( अक्षयला -- ) इतकं त्या बोलातायत तर बघ बाबा -- पुन्हा कशाला येतायत त्या इतकं झाल्यावर ! --

अक्षय : आयुष्याचं हे एकूण अवघडच असतं ! पण तरीही आपण स्वत:ला सामान्य म्हणून घेऊ नये. पळवाट असते ती. धर्म जर सगळ्यांना समजण्यासारखा नसता तर सांगितला कशाला असता संतांनी ? सामान्यबिमान्य काही नाही. ' बुडतां हे जन न देखवे डोळां '-- असं कशाला म्हणाले असते ते ? म्हणजे तरणं सगळ्यांना शक्य असलं पाहिजे --

समीर : बरं दोघांचंही जाऊं दे -- छाप-काटा तरी करू या का -- जाऊं दे -- तो तरी चान्स घेऊ आता --

अक्षय : असल्या जुगारी पध्दती वाईट !

समीर : बघ, आम्हीच सगळं पडतं घेतोय, पण तू मात्र जराही हलत नाहीयस -- शेवटी तिच्या वयाचा तरी विचार कर एवढंच माझं म्हणणं आहे --

काकू : आणि छाप-काटा नको -- तो जिंकला म्हणजे ?--

अक्षय ( समीरला -- ) पट्टी काढ की आता ती -- काय लिहिलंय त्याच्यावर --

समीर : असूं दे -- ' गणपती बाप्पा मोरया ' असं लिहिलंय --

अक्षय : मी जाऊ का आता ? झोप यायला लागली --

समीर : मिरवणूक नाही बघत ? आजिबातच ?

काकू : तो झोपत असला तर आधी ठरवून घे सगळं -- पुन्हा उठवायला नको त्याला -- आपण बसू मग बघत --

समीर : ( उठून वैतागून येरझाऱ्या घालत -- ) इंटेन्सिव्ह केअर युनिट आहे तिच्या मारी -- ( अचानक काकूंजवळ जाऊन थोडं बसत -- ) चल, आता जमेल का तुला खालपर्यंत यायला -- गोड बोलून बोलून डोकं उठलं माझं ! --

काकू : काय वेडाबिडा का काय तू ! मारतोस का काय मला ! -- खाली चल म्हणे -- (समीर वैतागून उठतो -- ) इथंच जमवायचं बघ -- दुसरे सगळे विचार दे सोडून --

बळवंतराव: सगळ्यांनीच शांतपणानं घ्या जरा --

अश्विनी : ( अवंतीला -- ) आपल्याला दुसऱ्या कसल्या गप्पाही मारता येत नाहीत --

अवंती : काय करणार अगं !-- चल कॉफी करू आपण --

बळवंतराव: निघेल हो मार्ग ! थांबा ! -- ( साकेतच्या रडण्याचा आवाज येतो. त्या उजवीकडे आत जातात. नंतर आवाज थांबतो.)

समीर : (अक्षयला -- ) मी तर म्हणतो, उलट तू चुकतोयस -- तू समज हे दार उघडून घ्यून तिकडं आत वाचत बसला असतास तरी या मिरवणुकीचा काही प्रश्नही आला नसता तुझ्यापुढे -- पण आता काय झालंय -- अडकून पडलायस तू या मिरवणुकीत -- गुरफटलायस -- बाहेर पडणंच अवघड झालंय तुला --

अक्षय : कसं काय ?

समीर : तू मुक्तच हो नं या मिरवणुकीच्या झंझटातून !

अक्षय : तुम्ही का नाही होत ? मुक्त ?

समीर : या मिरवणुकीला विरोध करण्याच्या नादात तिनंच व्यापून टाकलंय तुझं मन !

अक्षय : असं चालेल सध्या ! आणि तुम्ही लावून धरताय म्हणून असं होतंय ! आम्ही दोघंच असतो घरात तर हे बंद ठेवून मी वाचत बसलो असतो नुसता ।

समीर : पण या मिरवणुकीचा विरोध मनात ठेवून ! मी म्हणतो, या मिरवणुकीलाच का तुझा विरोध ? तुझ्याच विचारानं म्हटलं तर आणखी कितीतरी ठिकाणी विरोध करायला पाहिजे !

अक्षय : शक्य तेवढा आणि जमेल तिथं तरी प्रामाणिकपणा ठेवायचा ! मनातनं सगळा विरोधच नाहीसा होईल तेव्हा काही प्रश्नच येणार नाही ! हे नकळत छान बोललास तू ! छान ! विचार कर याच्यावर !

समीर : पण माझं छान बोलणं तुलाच उपयोगी पाडतोयस तू ! खरं तर ते माझं आहे !

अक्षय : हं -- ( काही क्षण शांतता. )

काकू : आणि त्याला सांग -- आत जायचं नाही म्हणावं -- आम्ही आलोय एवढं लांबून -- पुन्हा फार तर येणार नाही म्हणावं तुझ्याकडे -- पण आत अजिबात जाऊन बसायचं नाही --

अक्षय : म्हणजे हे माझ्यावर अत्याचार सुरू झाले आता --

समीर : ( काकूंकडे पाहात -- ) बघितलंस ! उलटंच बोलतोय सगळं ! आपल्याला वाटतंय की हा एक प्रकारे आपल्यावर अत्याचार करत बसलाय ! आहे की नाही !

बळवंतराव: समीर, अक्षय, जाऊं द्या ! उगीच आता हे सगळं काही वाढवत बसू नका ! तेवढा एक गणपती पाहू द्या

त्यांना -- झालं ! तोडगा काढा आता काहीतरी ! अक्षय, ऐक तू, तेवढा एक पाहू दे त्यांना ! -- समीर, तू फार तर तो किती लांब आहे, कुठपर्यंत आलाय ते पाहून ये ! चला, आता बोलून गेलोय, शब्द मोडू नका ! ( समीर अक्षयकडे बघत बसलेला -- )

अक्षय : बघून ये तू -- त्याबद्दल काही नाही --

समीर : ( रडवेला होत --) अरे, मी आलोय रे बाबा बघून, मला काय सांगतोस बघून ये म्हणून -- हिला – हिला बघायचाय --

बळवंतराव: अक्षय, एवढं पण नाही ऐकत ? मी जातो मग -- करू काय मी इथं बसून -- इतकं हे असलं मी कुठं बघितलं नव्हतं -- एवढीही किंमत नसेल तर यायचं तरी कशाला तुझ्याकडे -- हे शेवटचं समज तू -- ती कॉफी आणतीय तेवढी घेतो न् जातो मी --

काकू : बळवंतराव, तुम्ही जाऊ नका --

बळवंतराव: अहो काकू, त्याची प्रतिक्रिया यायच्या आधीच कशाला बोलताय तुम्ही !

अक्षय : एक एवढं तुमच्या म्हणण्याप्रमाणे झालं नाही तर किती टोकाला जाताय बघा तुम्ही ! एवढे टक्के टोणपे खाल्लेल्या वयाला शोभत नाही हे ! ( अवंती - अश्विनी कॉफी घेऊन येतात. वाटतात. मग बसतात.)

समीर : च्यायला, वातावरण असं झालंय की मोठ्ठं काहीतरी भांडण झालंय घरात आणि सगळे विचारात पडलेत. तसं झालेलं तर काहीच नाही ! ( सगळे कॉफी पीत राहतात -- ) खुळचटपणा आहे च्यायला। मला नव्हतं याचं हे असलं माहीत ! -- बरं -- ( कॉफीची कपबशी ठेवून --) आम्ही येतो बघून कुठपर्यंत आलाय ते -- ( अश्विनीला ) चल गं --

बळवंतराव: ती कशाला ? दुसरे कुठलेही गणपती बघायचे नाहीत आता -- फक्त तोच कुठपर्यंत आलाय तेवढंच बघून यायचं --

समीर : मी जेव्हा या गर्दीतून पुढे जाईन तेव्हा कुणाला कळेल तरी का की मी असल्या प्रॉब्लेममुळं फिरतोय म्हणून ! किती आनंदानं मिरवणूक बघत फिरत असतात लोक ! बरं मी येतो जाऊन -- ( जातो. अश्विनी दार लावून येते. )

अक्षय : तुम्ही सगळे मिळून हातोड्या घेऊन सारखं माझ्या डोक्यावर मारत बसलाय ! आणि वर इथनं हलायचं नाही म्हणताय ! पण ठीक आहे ! तेवढं सोडून बाकी सगळं ऐकणार आहेच मी -- आपलं मन सारखं काही ना काही उपभोगत राहिलं पाहिजे ही हाव धरायची पण चंगळवादी दुसऱ्यांना म्हणायचं असले लोक आहात तुम्ही -- पण ठीक आहे -- तेवढं सोडून बाकीचं ऐकतो मी --

काकू : कुणाच्या डोंबलावर घालायचं तुझं ते ऐकणं --

अक्षय : म्हणजे काय ? मार खात इथंच बस म्हटलेलं ऐकतोय ना मी !

काकू : तू मार खाण्याचा आम्हाला काय उपयोग ?

( इथं अंधार होत जातो. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा समीर व्यतिरिक्त बाकी सगळे. )

अवंती : ( अक्षयला -- ) तुझ्या या वागण्याचा मलासुध्दा हळूहळू धक्का बसत चाललाय --

अक्षय : धक्का नसेल मग तो -- हळूहळू बसला तर त्याला धक्का म्हणत नाहीत -- धक्का म्हणजे एकदम जोरात बसतो तो --

अवंती : हे तुझं अती वाटतंय मला -- इतकं एखाद्या म्हाताऱ्या माणसाचं मन मोडणं मला माणुसकीचं वाटत नाही -- आणि सगळं आयुष्य एकत्र काढायचंय आपल्याला --

अक्षय : मघाशी कॉफी करताकरता हा तुझ्याकडचा शेवटचा बाण काढायचं आश्वासन दिलेलं दिसतंयस तू अश्विनीला --

अवंती : ती कशाला काय म्हणतीय -- मलाच हे असह्य वाटायला लागलंय आता -- हास्यास्पद आणि वेडेपणाचं वाटायला लागलंय -- आणि असं जर तू करायला लागलास तर मी सुध्दा सापडेन कधीतरी तुझ्या या असल्या विक्षिप्त कचाट्यात -- आपलं तडाख्यात --

अक्षय : एकेक वर्ष एकेकाच्या म्हणण्याप्रमाणे करायचं ठरलंय नं -- आता विक्षिप्तपणाचा कुठं प्रश्न येतोय ! --

अवंती : ठरलं असलं तरी या बदललेल्या परिस्थितीत तेच लावून धरावं असं मला पटत नाही -- फार तर पुढलं वर्षही तुलाच घे -- पण आता हे ताणू नकोस -- त्यांचे आशीर्वाद घ्यायला हवेत उलट आपण --

अक्षय : काकूंचे आशीर्वाद आणि शिवाय तुला त्यागाचा मोठेपणा ! पण तसं नको ! पुढच्या वर्षी आणखी दुसरं काहीतरी उद्‌भवेल ! आता थोडंच राहिलंय -- संपतच आलंय -- तर हेच चालवून पूर्ण करू -- हे कधीही करायचं म्हटलं तर असल्या प्रश्नांना तोंड द्यावं लागणारच -- प्रत्येक वेळी -- यावेळी जाऊं दे -- असंच होणार -- हाडीमासी -- रक्तात भिनलेलं आहे हे सगळं सगळ्यांच्या -- एकाही माणसाला हे बाहेर पडू देणार नाहीत -- या ना त्या प्रकारे त्याच चाकोरीत धरून ठेवणार -- जबरदस्ती करणार -- आणि हे सगळ्यांचंच असल्यामुळं तेच बरोबर ठरणार ! ( प्रेक्षकांना -- ) सॉरी, तुम्हालाही कदाचित जरा हे अतीच वाटत असेल, पण, एक लक्षात घ्या – नाही तरी हे एक नाटकच चाललेय – बघू तरी जरा ताणून, या विचारानं चाललोय पुढे – ( पुन्हा नाटकात जातो. )

काकू : कुठून इथं आलो असं झालंय मला -- त्यापेक्षा आलोच नसतो तर बरं झालं असतं -- ( डोअरबेल वाजते. अवंती जाऊन दार उघडते. समीर येतो. ती दार लावून घेते. काकू समीरकडे बघताहेत.)

समीर : जवळ आलाय आता अगदी -- वीसेक मिनिटांत इथं येऊन पोचेल ! अप्रतिम सजावट आहे ! पुन्हा बघितल्यावर तर भारावून गेलो अगदी ! सगळ्यांनी बघायलाच पाहिजे !

काकू : तेच तेच सांगू नकोस !

अवंती : ( अक्षयला -- ) आता तो गणपती जवळजवळ येत जाईल तसतसं टेन्शन वाटत जाईल -- काही बरंवाईट झालं तर ते आपल्यावर येईल हे लक्षात घे --

अक्षय : कोण वाढवतंय टेन्शन ? टेन्शन न वाढवता, त्याची भीती न वाढवता खरं तर तुम्हाला राहता येईल -- तिचं तिनं टेन्शन वाढवलं तर त्याला तीच जबाबदार --

काकू : काय निर्लज्ज आहे गं बाई ! माझ्या म्हातारीच्या जिवाची पण पर्वा नाही --

बळवंतराव: हा गणपती जर का इथून पास होऊन गेला नं -- तर मग ज्याचं त्यालाही काही ठरवावं लागेल -- काय होईल ते वेगळंच !--असल्या भयानक माणसाबरोबर संबंध ठेवायचे की नाही तो विचारच करावा लागेल--

समीर : मीही आता सांगतो -- असं झालं तर आम्हीसुध्दा आयुष्यात पुन्हा याच्या घरात पाऊल टाकणार नाही --

बळवंतराव: आणि तत्त्वज्ञान हे फक्त स्वत: आचरणात आणायचं असतं -- अशी दुसऱ्यांना सक्ती करायची नसते हो -- संत लोक तर किती नम्र होते --

अक्षय : मी कसं वागायचं ही तुम्ही का सक्ती करताय मग ?

बळवंतराव: अरे आम्ही एवढं काही शोधायला निघालेलोच नाही -- शोधायची सक्ती थोडीच आहे ?

अक्षय : सारखं दुसऱ्यांची मनं सांभाळत बसायची पध्दत घाणेरडी आहे एवढं माझ्या लक्षात आलेलं आहे -- ती पध्दत पटली तर सारखं स्वत:च्याच विरुध्द वागावं लागतं -- शोध घेणं बंदच होतं मग --

बळवंतराव: तू तुझ्या डोक्यात शोध घे रे -- बाहेर आम्ही सांगतो असं वाग --

अक्षय : म्हणजे हेही तुम्हीच ठरवणार ! आणि खरं काय याचा शोध तुम्हीही का घेऊ नये ?

बळवंतराव: अरे पण, तुलाही काही नीट समजलेलं नाहीच म्हणतोस नं -- मग कशाला --

अक्षय : पण समाजाचा फोर्स असा झुगारायचा आहे मला -- हे फालतू सगळं जे हॅमर केलं जातंय त्याचा प्रतिकार करायचाय -- सारखं काही ना काही साजरं करत जगायच्या रोगट पध्दतीला नकार द्यायचाय मला -- आणि धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या या सगळ्या अधार्मिकपणालाही ! --

बळवंतराव: बघ बाबा ! नुसतंच आमच्या विरुध्द राहण्यात काय मतलब आहे ! धोका आहे यात !

अक्षय : कल्पना आहे मला -- पण बरोबर कोण हे तरी कसं ठरवणार ? -- गर्दीचा आधार न घेता बोला --

समीर : ( अश्विनीला-- ) ए, जाऊं दे चल ! सामान आण आपलं ! इथं थांबण्यात काही अर्थ नाही ! आपण परत जाऊ या सोलापूरला --

अश्विनी : आणि आईंना काय उचलून नेणार का ? मिरवणूक संपल्याशिवाय कसं जाणार ?

अवंती : आणि भाऊजी, अशी डोक्यात राख घालू नका -- मला पटतंय तुमचं पण माझाही नाईलाज होतोय – मला काय वाटेल याचाही विचार करा -- उद्याचा मी स्वयंपाकाचा बेतसुध्दा ठरवलाय -- अशी मोडतोड करू नका --

काकू : याला अंगाखांद्यावर खेळवला होता गं मी -- वाटलं नव्हतं हा असा होईल !

अक्षय : वाईट !

अवंती : ( अक्षयला -- ) तो गणपती एकदा इथून गेला पुढे की नंतर वाईट वाटून काही उपयोग होणार नाही – संबंध कायमचे बिघडतील -- तुझी विचित्र म्हणून प्रसिध्दी होईल सगळीकडे -- आपल्यालाही वेळप्रसंग असतात -- विचार कर !

अक्षय : हं --

बळवंतराव: एखादा मनुष्य आजारी असला शेजारी आणि एखादं औषध आणून दे म्हणून तुला सांगितलं तर देशील की नाही औषध आणून -- इतकं खरं तर सोपं आहे हे --

अक्षय : मग मीच तो आजारी मनुष्य असून तुम्हालाच औषध आणायला सांगितलंय असं का नाही समजत !

बळवंतराव: मी तुझे पाय धरून नमस्कार केला तर चालेल का -- नाही, इच्छा झालीय तशी म्हणून विचारतोय --

अक्षय : नको --

समीर : आता फक्त पंधरा मिनिटं -- हा काही ऐकत नाही -- फिजिकल ॲक्शन शक्य नाही -- आणि हे नुसतंच काउंट डाऊनचं टेन्शन वाढत जाणार -- त्यापेक्षा हा विषय आता सोडून देऊ -- दुसरंच काही बोलत बसू म्हणजे तोपर्यंत तो पुढं जाईल -- ( अक्षयकडे जाऊन -- ) गाणं म्हणू का ?

अक्षय : कुठलं ?

समीर : ' जिंदगीके रंग कई रे, साथी रे ' ?

अक्षय : नको.

समीर : बरं, ' मेरे टुटे हुए दिलसे कोई तो आज ये पूछे के तेरा हाल क्या है ' ?

अक्षय : नको.

समीर : बरं, ' माळ्याच्या मळ्यामंदी ' तरी ?

अक्षय : नको, कुठलंच नको.

समीर : ( नाराजीनं लांब जात -- ) मी अक्षयशी बोलणं या क्षणापासून बंद करतोय -- आम्ही इथं एका विश्वासानं आलो होतो -- पण जाऊं दे -- वहिनी दुखावली जाईल असं काही बोललं जाता कामा नये माझ्याकडून --

बळवंतराव: रिक्वायर्ड रनरेट वाढत चालल्यासारखं झालंय -- निव्वळ खुळचट जिद्दीवर -- हा काही खेळ नव्हे --

अवंती : मला या सगळ्या प्रकाराचं वाईट वाटतंय एवढंच मी म्हणू शकते --

अश्विनी : तू काही करू शकत नाहीस गं -- समजत का नाही आम्हाला --

अक्षय : हे सुध्दा सगळं मी ऐकत बसायचं ? अन्याय आणि जुलूम सहन करायचा दिवस आहे आज माझा !

समीर : ठीक आहे -- हा विषय आता बंद -- ( काही क्षण शांतता. काकूही आता काही बोलत नाहीत. नुसत्या पाहात बसलेल्या. )

अक्षय : तुमच्या स्वत:च्या स्वाभिमानाच्या दृष्टीनंसुध्दा तुम्ही मला इतकं महत्त्व द्यायला नकोय -- मलाच ऑकवर्ड होतंय ते --

समीर : बरं अश्विनी, उद्या जेवण झालं की निघू आपण -- पण उद्या सुट्टी नाहीय वहिनी --

अवंती : तुम्ही आलाय नं -- मी रजा घेईन उद्याचा दिवस -- याला जाऊं दे --

समीर : तुझं मन मोडायचं नाही म्हणून ठीक आहे वहिनी -- पण थांबावं असं वातावरण नाही --

अवंती : आणि तुम्हाला इथं खाली घराजवळ रिक्षाही दुपारी चारपाच नंतरच मिळणार --

बळवंतराव: जाऊं द्या -- ठीक आहे -- हे चांगलं नाहीच -- पण असे जन्मभर काही राग धरून बसू नका -- पुढल्या वर्षी उलट पटलं तर तोच पत्र पाठवेल तुम्हाला की मिरवणूक बघायला या म्हणून --

समीर : ते बघू आता --

बळवंतराव: ( विषय बदलत --) या वर्षी सर्वात जास्त गणेशमूर्ती अहमदनगरमधून सप्लाय झाल्या म्हणे -- हा बिझिनेस फार वाढतोय तिकडे -- ( काही क्षण शांतता. ) आता तुम्ही कुणी काही याच्यावर बोलल्याशिवाय हा दुसरा विषय पुढं कसा जाणार -- प्रतिसादाशिवाय काय उपयोग आहे ? -- बरं, समीर, टिळक रोडवर महाराष्ट्र मेडिकल समोर एक भेळेची गाडी असते -- तिथली भेळ खाल्लीयस कधी ? -- बेस्ट असते !

समीर : नाही अजून ! ( पुन्हा शांतता.)

बळवंतराव: तरी दहा तरी मिनिटं असतील अजून ! बघून येतोस का एकदा -- नाहीतर तो इकडून पुढे निघूनही जायचा आणि आपण निष्कारण त्याच टेन्शनमधे राह्यचे -- इथून काही दिसतही नाही -- आणि कळतही नाही --

समीर : आयुष्यात मी कधी एका दिवशी इतकं डोक्याचं काम केलेलं नाही -- मला आता जरा शारीरिक हालचाल केली पाहिजे -- ( उठून जरा बाजूला जाऊन जॉगिंग सुरू करतो -- )

बळवंतराव: थांब -- थांब जरा -- खाली माती पडते बाबा -- ( समीर थांबतो. ) नुसतं आमच्या घरात जाऊन विचारून ये जवळ आला का ते -- जा -- ( समीर जातो. तो येईपर्यंत सगळे गप्प. तो आत येतो. दार लावतो. )

समीर : ( येऊन खुर्चीवर बसत -- ) दिसायला लागलाय -- आता पाचेक मिनिटांत इथे समोर येईल --

बळवंतराव: ही मधली मिनिटं अशी चिमटीनं मिटवता यायला पाहिजे होती --

अश्विनी : म्हणजे प्रयत्न सोडूनच दिलाय सगळ्यांनी -- ( अक्षयला -- ) भाऊजी माझी एक पदर पसरून विनंती आहे -- आईंचं एवढं मन मोडू नका -- आम्ही काही पुन्हा पुन्हा येणार नाही तुमच्याकडे --

समीर : च्यायला, हे याचंच घर आहे आणि अवंती वहिनीचा प्रश्न आहे म्हणून, नाहीतर धरून पिटला असता याला कुणीतरी --

अवंती : असं बोललेलंही आवडणार नाही हं मला --

समीर : सॉरी ! समजून घ्याल तुम्ही !

बळवंतराव: समजा तो गणपती इथून जाताना काकूंना बघता आला तर आणि नाही बघता आला समजा, तर इथं

काय घडेल ? याच्यावरच्या सगळ्यांच्या कल्पना तपासल्या तर मजा येईल !

अश्विनी : फारच झालंय हे सगळं --

अवंती : आणि माझा तर काही इलाज नाही -- हे त्याचं असं जगावेगळं वागणं मला काही पटलेलं नाही -- आणि मी हे स्पष्ट सांगितलेलं आहे -- याची सगळी जबाबदारी त्याची --

बळवंतराव: या महान माणसापुढं आपण सगळेच फार थिटे पडलो पण -- किती वाजले ?

समीर : दीड --

बळवंतराव: रिझर्व्हेशन करायचं असेल उद्याचं ?

समीर : उद्या सकाळी करणार --

बळवंतराव: सामान काही जास्त नसेल --

समीर : फक्त एक सूटकेस आहे --

बळवंतराव: किती तास लागतात ?

समीर : सहासाडेसहा तास --

बळवंतराव: तुमचं स्वत:चं आहे का घर ?

समीर : नाही -- भाड्याचं आहे --

बळवंतराव: नोकरीचं ठिकाण जवळ आहे का ?

समीर : नाही -- जरा लांबच आहे --

बळवंतराव: काकूंचा वेळ कसा जातो ? ( इथे काकू उठतात. सगळ्यांचे लक्ष आहे. कशाबशा उभ्या राहतात. हळूहळू चालत समोर येतात. नजर संतप्त. )

काकू : ( अक्षयला -- हळू आवाजात --) दे किल्ली -- ! ( तो स्वस्थ. ) किल्ली दे -- ( तो पाहतोय. आता काकू एकदम जोरात ओरडतात --) किल्ली दे ! दे किल्ली ! मी प्राण जाईपर्यंत ओरडत राहीन नाहीतर ! (चेहरा भयंकर संतप्त. अक्षय त्यांच्या चेहऱ्याकडे पाहात राहतो. आता हे निकराला आल्याचे त्याच्या लक्षात येते . काकूंचा हात पुढे. तो तसाच पाहात खिशातून किल्ली काढतो . काकूंच्या हातावर ठेवतो. काकू क्षणभर पाहतात. मग -- )

काकू : ( अवंतीला-- ) हं -- ( किल्ली तिच्या दिशेने धरतात. अवंती येऊन किल्ली घेते. भरभर जाऊन कुलूप काढते. दार उघडते. ढोलताशांचा दणका -- रोषणाईचा प्रकाश. तशीच भरभर जाऊन वरची खिडकी उघडते. काकू हळूहळू दाराच्या दिशेने जाऊ लागतात. आगेमागे अश्विनी, समीर आणि बळवंतराव. अवंती येऊन अक्षयजवळ उभी राहते. अक्षयजवळ उभी पण गॅलरीकडे वळलेली. गोंधळलेली. इथे एकदम अंधार होतो. आवाज चालू. पुन्हा प्रकाश पडतो तेव्हा बाहेरच्या गॅलरीचा कठडा समोर घेतलेला असावा. खालच्या, खिडकीसमोरच्या भागाला ठोकलेला पत्रा दिसावा. मिरवणूक उजवीकडून डावीकडे जाणारी असल्याने आता प्रकाशयोजना डावीकडून उजवीकडे. हे दृश्य आता प्रेक्षक जणू रस्त्याच्या बाजूने पाहात आहेत. मागे मान खाली घातलेला अक्षय बसलेला. जवळ अवंती उभी -- पाठमोरी -- गॅलरीकडे पाहात असलेली. ढोलताशे, लेझीम, झांजा यांचे आवाज.' गणपतीबाप्पा मोरया ' वगैरे आवाज. काकू मधे, एका बाजूला बळवंतराव आणि एका बाजूला समीर--अश्विनी. बळवंतरावांचा चेहरा भावहीन. समीर त्रस्त. अश्विनीच्या चेहऱ्यावर किंचित स्मित. काकूंचा चेहरा मात्र उजळलेला. डावीकडून हळूहळू रोषणाईचा प्रकाश येतो. काकू उत्फुल्ल. तीनदा नमस्कार करतात. बाकीचे एकेकदा नमस्कार करतात. काकूंच्या चेहऱ्यावर अत्यंत वखवख. ते दृश्य डोळ्यांनी ओरबाडून खात असल्याप्रमाणे पाहात राहतात. रंगीबेरंगी प्रकाश डावीकडून उजवीकडे सरकत जातो. मग एका

ठिकाणी स्थिर होतो. वाद्यांचा प्रचंड दणका चालू. हळूहळू प्रकाश एकवटत काकूंच्या चेहऱ्यावर स्थिर होतो. आता फक्त काकूंचा, रंगीबेरंगी प्रकाशातला, हावरट, आनंदी चेहरा. मिरवणुकीचा बाकी सगळा गोंधळ चालू ... पडदा पडत जातो ...)

--- **अंक दुसरा समाप्त** ---

**--- ००० ---**

सूचना : सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन. प्रयोगापूर्वी लेखी अनुमती घेणे आवश्यक आहे.

पत्ता -चं.प्र.देशपांडे,
३, स्नेहदीप अपा. चिंतामणीनगर, सहकारनगर नं.२, पर्वती,
पुणे - ४११ ००९.
मोबाइल - ९३७१००५७७३.

संकेतस्थळ – [www.champralekhan.com](http://www.champralekhan.com)